SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/७७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०४.०९.२०२६ | अंक नं. १३३ | वर्ष ६१ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020


CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹ 50000/- सोने खरेदीवर
₹ 20000/- चांदी खरेदीवर
₹ 5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹ 5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹ 999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदूकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

## इस्रोने ४ सप्टेंबरला पहाटे रचला इतिहास, ईओएस-०५ रॉकेटचे झाले यशस्वी प्रक्षेपण

### ३६००० किमी वरून ठेवणार भारतावर करडी नजर



श्रीहरीकोटा - देश झोपेत असतांना भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने इतिहास रचला. श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुसऱ्या प्रक्षेपण पॅडवरून जीएसएलव्ही-एफ १७ रॉकेटच्या मदतीने पृथ्वी निरीक्षण उपग्रह-०५ (ईओएस-०५) चे यशस्वी प्रक्षेपण केले. पृथ्वी निरीक्षण उपग्रह ईओएस-०५ जीएसएलव्ही-एफ १७ या प्रक्षेपण वाहनाने उप-भूस्थिर संक्रमण कक्ष (सब जीटीओ) मध्ये अचूकपणे स्थापित केले. हे प्रक्षेपण ४ सप्टेंबर रोजी पहाटे २ वाजून ५५ मिनिटाला झालं.

ईओएस-०५ हा पृथ्वीपासून सुमारे ३६००० किलोमीटर उंचीवरून फोटो काढणारा उपग्रह आहे. हा भारताचा पहिलाच असा कॅमेरा-उपग्रह आहे जो एवढ्या उंचीवरून फोटो काढेल. हा कॅमेरा एवढ्या उंचीवर असल्याने तो पृथ्वीच्या वेगानेच फिरतो. यामुळे भारतावर २४ तास सतत लक्ष ठेवणार. जीएसएलव्ही-एफ १७ या प्रक्षेपण वाहण्यात पाठवण्यात आलेला सर्वाधिक वजनाचा उपग्रह आहे. त्याचं वजन २३६७ किलो आहे.

ईओएस-०५ हा कॅमेरा शेतीच निरीक्षण, चक्रीवादळ, पूर, ढगफुटी, सीमेवरील हालचाल अशा देशाच्या सुरक्षितेसाठी महत्वाच्या माहितीचे लाईव्ह फोटो पाठवणार. आतापर्यंत आपले उपग्रह कमी उंचीवरून फोटो काढायचे. म्हणजे ६०० किमी अंतरावरून फोटो काढायचे. त्यामुळे २४ तासातून एकदाच आपल्याला फोटो मिळत होते. मात्र आता हा कॅमेरा ३६००० किमी वरून आपल्याला भारतावर २४/७ करडी नजर ठेवणार आहे. हे उपग्रह ९ वर्ष काम करणार. या उपग्रहाला 'आय इन स्काय' असे एका वरिष्ठ शास्त्रज्ञाने वर्णन केले आहे.

इस्रो प्रमुख डॉ. व्ही. नारायणन म्हणाले की, मला हे जाहीर करतांना अत्यंत आनंद होत आहे की, जीएसएलव्ही-एफ १७ या प्रक्षेपकाने ईओएस-०५ या जिओ-इमेजिंग उपग्रहाला त्याच्या नियोजित आणि आवश्यक कक्षेत यशस्वीरीत्या व अचूकपणे स्थापित केले आहे. ईओएस-०५ हा कार्यान्वित झाल्यानंतर भूस्थिर कक्षेतून कार्य करणारा भारताचा पहिला समर्पित इमेजिंग उपग्रह ठरणार आहे. हे उपग्रह महत्वाचे 'स्ट्रॅटेजिक डाटा' भारताला पुरवेल अशी अपेक्षा आहे.

मिशन डायरेक्टर थॉमस कुरियन यांनी सांगितले की, जीएसएलव्ही-एफ १७ हे प्रक्षेपण वाहन ५१.७ मीटर उंच असून त्याचे लिफ्टऑफ वजन ४२०.५ टन आहे. त्यामुळे हे भारतातील कार्यरत असलेल्या सर्वात मोठ्या प्रक्षेपण वाहनांपैकी एक आहे. या एजड 'निअर रिअल-टाइम' फोटो घेण्यास सक्षम आहे. जीएसएलव्ही द्वारे जीटीओ किंवा सब जीटीओ कक्षेत प्रक्षेपित केलेला हा आतापर्यंतचा सर्वात जड उपग्रह आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रकल्प संचालक इम्तियाज अहमद यांनी ईओएस-०५ चे वर्णन 'मल्टी-बँड' कार्य करण्याची क्षमता असलेला एक अद्वितीय आणि वैशिष्ट्यपूर्ण उपग्रह असे केले आहे. त्याची रचना, यंत्रणा आणि कार्य क्षमता या दृष्टीने हा एक गुंतागुंतीचा उपग्रह आहे. प्रक्षेपणाची प्रक्रिया २ सप्टेंबर रोजी रात्री ११:३० वाजता सुरु झाली. २७ तासांची सुरळीत 'काउंटडाऊन' पूर्ण झाल्यानंतर सतीश धवन अंतराळ केंद्रावरील दुसऱ्या प्रक्षेपण मंचावरून पहाटे २:५५ वाजता या रॉकेटने आपली झेप घेतली. पहाटेची वेळ आणि पाऊस असूनही प्रक्षेपणाचा आनंद घेण्यासाठी अनेक नागरिक छत्री घेऊन मोठ्या संख्येने तिथे उपस्थित होते. त्यांचा उत्साह कमी न होता ते प्रोत्साहन देण्यासाठी तिथे उपस्थित होते.

## जिल्हा शासकीय रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर अनियमितता

### जिल्हा शल्यचिकित्सकांवर निलंबनाची कारवाई करण्याची मनसेची मागणी

नगर - अहिल्यानगर जिल्हा शासकीय रुग्णालयातील मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार सुरु असून या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत शहर अध्यक्ष गजेंद्र राशिनकर आणि शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आरोग्य समिती अध्यक्ष यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हंटले आहे की, अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून काही विशिष्ट कर्मचारी यांच्या बदल्या होत नाहीत. शासनादेशाने बदली झाली असली तरी प्रत्यक्ष सेवा ही जिल्हा रुग्णालयातच चालू ठेवली जाते. या सर्व अनियमिततेस जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय जबाबदार आहे.

अलीकडेच जिल्हा रुग्णालयातील एम एलसी रिपोर्टमध्ये गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. एका डॉक्टरांनी एमएलसी रिपोर्टमध्ये खाडाखोड करून तो बदलला आहे. तक्रारदार रुग्णाचे असे म्हणणे आहे की, संबंधित डॉक्टरांनी उपचारासाठी पैसे मागितले. पैसे न दिल्याने त्यांचा एमएलसी रिपोर्ट जाणूनबुजून बदलण्यात आला. या संदर्भातील पुरावे व कागदपत्रे या निवेदनासोबत जोडत आहोत.

सदर प्रकार घडत असताना जिल्हा शल्यचिकित्सक हे संबंधित कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहेत आणि त्यांच्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांचा शासकीय रुग्णालयावरील विश्वास उडत आहे. म्हणून आपणास नम्र विनंती आहे की, उपरोक्त गंभीर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यावर प्रशासकीय निष्काळजीपणा व भ्रष्टाचारास पाठीशी घातल्याबद्दल तात्काळ निलंबनाची कारवाई करावी. जर सदर निवेदन दिल्यापासून ८ दिवसांच्या आत योग्य ती कारवाई झाली नाही, तर आम्हाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करावे लागेल याची नोंद घ्यावी. असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

## मनोज जरांगेंच्या मागण्या मान्य

### मुदत मागितल्याने उपोषण कायम

आंतरवाली सराटी - मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा ४ सप्टेंबर रोजी ७ वा दिवस आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांची आंतरवाली सराटी येथे ३ सप्टेंबर रोजी रात्री भेट घेतली. त्यांच्यासोबत ३ तास चर्चा केली. जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्या त्यांनी मान्य केल्या व उपोषण मागे घेण्याची विनंती केली. मात्र, जरांगेंनी मागण्यांवर तात्काळ कार्यवाहीचा आग्रह धरला. त्याची पूर्तता करण्यासाठी ११ सप्टेंबरपर्यंत सरकारने मुदत मागितली. त्यामुळे जरांगेंनी उपोषण कायम ठेवले.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, आमदार प्रसाद लाड, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आदी उपस्थित होते. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी बोलताना सांगितले की सरकारने आमची एकही मागणी मान्य केली नाही, मग आम्ही मागण्या मान्य केल्या म्हणायचे कसे? केवळ मंत्री आले म्हणून उपोषण मागे घेता येणार नाही, माझ्यासाठी माझा समाज महत्त्वाचा आहे.

११ सप्टेंबरपर्यंत मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य करून त्यांची अंमलबजावणी करा, तरच उपोषण मागे घेईन. मागण्या मान्य झाल्यास ११ तारखेला मुंबईत गुलाल उधळू नाहीतर १२ सप्टेंबरच्या बैठकीत पुढील निर्णय घेऊ, असा इशारा देत मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला नवा अल्टिमेटम दिला आहे. मी सध्या पाणी पित आहे आणि सलाईन लावून घेत आहे, मात्र मागण्यांची अंमलबजावणी झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही. माझे शरीर आता साथ देत नाही, यापुढे जर पुन्हा उपोषण केले तर मी जगणार नाही. त्यामुळे जे काही करायचे आहे ते आताच करायचे असून, मराठा समाजाच्या सर्व मागण्या आताच मान्य करून घेणार आहे. मी मंत्र्यांच्या शब्दाचा मान राखत एकाऐवजी दोन सलाईन लावून घेण्यास तयार झालो आहे. मात्र, अंमलबजावणी पूर्ण झाल्याशिवाय मागे हटणार नाही. दरम्यान, जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यांत बंदची हाक देण्यात आली होती, त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक ठिकाणी रास्ता रोकोसह विविध आंदोलने करण्यात आली.

## 'सीईटी' च्या साडे चार लाख विद्यार्थ्यांचा गोपनीय डेटा लीक

मुंबई - महाराष्ट्र सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाशी संबंधित तब्बल ४ लाख ५९ हजार ४९३ विद्यार्थ्यांची अत्यंत गोपनीय वैयक्तिक माहिती लीक झाल्याची गंभीर घटना उजेडात आली असून, यामुळे शैक्षणिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सीईटी सेलच्या प्रशासनाने मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्यात अधिकृत पत्र देऊन कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

१ सप्टेंबर २०२६ रोजी नारायण शिंगारे यांनी ही डेटा लीक झाल्याची बाब सीईटी सेलच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर तात्काळ पावले उचलत सीईटी सेलच्या संगणकांची व यंत्रणेची फॉरेन्सिक तपासणी (ज्रीशपीळल 'बिळी) करण्यात आली. या तांत्रिक तपासात माहिती बाहेर फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचाली तीव्र झाल्या.

४ सप्टेंबर २०२६ रोजी आमदार रोहित पवार यांनी सीईटी कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन या संपूर्ण प्रकरणाची माहिती घेतली. या गंभीर डेटा लीक प्रकरणी तात्काळ पोलीस तक्रार दाखल करून कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे रोहित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. आमदार रोहित पवार यांच्या पाठपुराव्यानंतर आणि तक्रारीनुसार, सीईटी सेलचे प्रशासकीय अधिकारी श्रीकांत मडावी यांनी आझाद मैदान पोलिसांना अधिकृत पत्र सुपूर्द केले. या पत्रात पोलिसांनी नियमांनुसार तात्काळ आवश्यक कायदेशीर कारवाई करावी, अशी म ागणी करण्यात आली आहे.

जनसेवेतून निर्माण झालेला विश्वास
काळाच्या पलीकडेही राहतो खास...



स्व. कृष्णाभाऊ दत्तात्रय जाधव
(माजी उपनगराध्यक्ष)
यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!
समस्त जाधव परिवार
श्री साईद्वारका सेवा ट्रस्ट
श्री सिद्धेश्वर तरुण मंडळ
जंगुभाई तालिम ट्रस्ट

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरूमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे. आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

### जाहीर नोटीस

क्र.कावि/जन्म नोंद/एसआर/१४१/२०२६ — अहिल्यानगर दिनांक /०९/२०२६

प्रति.
श्री. इम्रान हनिफ शेख, रा. कोठला मैदान, मस्तान शाह दर्गासमोर ता. जि.अहिल्यानगर } ....अर्जदार
विरुध्द
अधिकारी. जन्म मृत्यू नोंदणी विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका ता.जि.अहिल्यानगर } ....सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्री.इम्रान हनिफ शेख यांनी सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री.इम्रान हनिफ शेख यांचा जन्म दि.०९/१०/१९८९ रोजी कोठला मैदान, मस्तान शाह दर्गासमोर, ता.जि.अहिल्यानगर येथे राहत्या घरी झालेला आहे. त्यांची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, अर्जदार श्री.इम्रान हनिफ शेख, यांचा जन्म दि.०९/१०/१९८९ कोठला मैदान, मस्तान शाह दर्गासमोर, ता.जि.अहिल्यानगर येथे राहत्या घरी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिद्धीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमुद अर्जदार श्री. इम्रान हनिफ शेख यांचा जन्म दि. ०९/१०/१९८९ रोजी कोठला मैदान, मस्तान शाह दर्गासमोर ता. जि. अहिल्यानगर येथे राहत्या घरी झालेला असलेबाबतची जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दिनांक / /२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**(स्वप्निल ढवळे)**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER
Career Ki Shuruwat DiSHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Get Any Course Just in 2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.
दिल्ली गेट शाखा 9371051769
पुणे बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# नगर–नाशिक ऑटो एलपीजी दरातील तफावत तपासा; रिक्षाचालकांना न्याय द्या

## रिक्षाचालक संघटनेची पुरवठा अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – अहिल्यानगर शहरातील ऑटो रिक्षाचालकांना एलपीजी गॅसच्या दरातील मोठ्या तफावतीमुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप करत या दराची तातडीने चौकशी करून गोरगरीब रिक्षाचालकांना न्याय व दिलासा द्यावा, अशी मागणी रिक्षाचालक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्या दालनात बैठक संपन्न झाली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, नासिर खान, संजय सहाणे, प्रकाश गोसावी आदी उपस्थित होते.

रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या शहरातील हजारो रिक्षाचालकांसमोर सध्या वाढता इंधन खर्च, वाहनाची देखभाल, दुरुस्ती, विमा, परवाना तसेच दैनंदिन कौटुंबिक खर्च अशा अनेक आर्थिक जबाबदाऱ्या आहेत. अशा परिस्थितीत ऑटो एलपीजीच्या दरात स्थानिक पातळीवर मोठी तफावत असल्यास त्याचा थेट परिणाम रिक्षाचालकांच्या उत्पन्नावर होत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, उपलब्ध कागदपत्रांमध्ये नाशिक जिल्ह्यात ऑटो एलपीजीचा दर प्रतिलिटर ५९.९४ रुपये, तर अहिल्यानगर शहरात ८४.४४ रुपये असल्याचे निदर्शनास आले आहे. दोन्ही जिल्ह्यांमधील दरामध्ये प्रतिलिटर सुमारे २४.५० रुपयांची तफावत असल्याने हा फरक नेमका कशामुळे निर्माण झाला, असा सवाल रिक्षाचालकांनी उपस्थित केला आहे. इंधनाच्या किमती ठरविण्यामागील नियम, कररचना, वाहतूक खर्च, कंपनीनुसार दर किंवा इतर कोणते घटक कारणीभूत आहेत, याची प्रशासनाने स्पष्टता करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.


एलपीजी गॅसच्या दरातील मोठ्या तफावतीची चौकशी करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांना निवेदन देताना रिक्षा चालक संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, नासिर खान, संजय सहाणे, प्रकाश गोसावी आदी.

अविनाश घुले म्हणाले, रिक्षा चालक हा शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या वाहतुकीचा महत्त्वाचा आधार आहे. दिवसभर रिक्षा चालवून मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा खर्च भागविताना अनेक रिक्षाचालकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील ऑटो एलपीजीच्या दरामध्ये एवढी मोठी तफावत का आहे, याचे उत्तर प्रशासनाने आणि संबंधित यंत्रणांनी देणे आवश्यक आहे. संघटनेच्या वतीने यापूर्वीही अहिल्यानगर शहरात शासनमान्य हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनी, भारत पेट्रोलियम कंपनी आणि इंडियन ऑइल कंपनीचे ऑटो एलपीजी पंप सुरू करण्याबाबत जिल्हा पुरवठा विभागाकडे निवेदन देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. मात्र, या मागणीवर अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याने रिक्षाचालकांमध्ये नाराजी असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. अहिल्यानगर शहरातील एलपीजी दर आणि नाशिक जिल्ह्यातील एलपीजी दर यांची तुलना करून दरातील तफावतीचे कारण शोधावे, संबंधित कंपन्यांकडून दर निश्चितीबाबत माहिती घ्यावी आणि रिक्षाचालकांकडून नियमबाह्य अथवा जादा दर आकारला जात आहे का, याची तपासणी करावी, अशी मागणी संघटनेने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली आहे. तसेच शहरातील एलपीजी वितरण व्यवस्था, उपलब्ध पंपांची संख्या आणि त्यांच्याकडून आकारण्यात येणारे दर यांचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली.

रिक्षाचालकांना परवडणाऱ्या दरात इंधन उपलब्ध होणे ही त्यांच्या दैनंदिन उपजीविकेची गरज आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. दरातील तफावत योग्य असल्यास त्यामागील कारणे स्पष्ट करावीत आणि चुकीची आकारणी होत असल्यास ती तातडीने थांबवावी, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे. दरम्यान, प्रशासनाने आता ७ सप्टेंबर रोजी पुन्हा एकदा मिटिंग चे आयोजन केले आहे यामध्ये जर काही तोडगा निघाला नाही तर संघटना तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले.

## १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – मुळची राहुरी तालुक्यातील व सध्या नगर तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला (वय १६) अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुलीच्या आईने २ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली आहे. त्या मुळच्या राहुरी तालुक्यातील एका गावातील राहणाऱ्या असून सध्या नगर तालुक्यातील एका गावात राहतात. १ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठ ते २ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान अज्ञात इसमाने मुलीला अज्ञात कारणासाठी फूस लावून तिच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. मुलगी घरी न आल्याने तिचा शोध घेण्यात आला. मात्र ती आढळून न आल्याने पोलिसांत फिर्याद दाखल करण्यात आली. पुढील तपास पोलीस अंमलदार विशाल थोरात करीत आहेत.

## बेशुध्द आढळलेल्या तरूणाचा मृत्यू

नगर – शहरातील सारसनगर ओढ्याच्या शेजारी अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी तरूण बेशुध्दावस्थेत आढळून आला, त्याला उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी उपचार सुरू करण्यापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची नोंद भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १ सप्टेंबर रोजी सारसनगर ओढ्याच्या शेजारी अंदाजे ३५ वर्षांचा एक पुरूष बेशुध्दावस्थेत आढळून आला. त्याची ओळख पटलेली नव्हती. त्याला पुढील उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी केली असता संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ. कोल्हे यांनी पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीचे नाव, पत्ता तसेच मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेचा तपास पोलीस अंमलदार व्ही. आर. गारूडकर करीता आहेत. पोलिसांकडून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध घेतला जात आहे.

## चिमाजी आगलावे यांचे वृद्धापकाळाने निधन


नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी चिमाजी विठोबा आगलावे (वय ८०) यांचे ४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. महादेव, बापू, सुखदेव आगलावे यांचे ते वडील होत.

## मुरलीधर रोहोकले यांचे दु:खद निधन

नगर – येथील रहिवासी मुरलीधर नानासाहेब रोहोकले (वय ८६) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.




त्यांच्या पश्चात ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथून क्रीडा प्रशिक्षक या पदावरून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या कार्यकाळात विविध क्रीडा प्रकारांत खेळाडुंनी नैपुण्य मिळविले होते.

ते महाराष्ट्र राज्य हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष, पारनेर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक, रयत शिक्षण संस्था उत्तर विभाग जनरल बॉडी सदस्य होते. त्यांना मोठा मित्रपरिवार होता. ते मनमिळावू स्वभावाचे म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## प्रल्हाद डोके यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सोनई येथील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रल्हाद गणपत डोके (वय ८५) यांचे ३ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. कार्यकारी अभियंता मिलींद डोके यांचे ते वडील होत.

## हिराबाई सानप यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – सिद्धीविनायक गणपती मंदिर रोड, मोरगेवस्ती येथील रहिवासी गं.भा. हिराबाई शामराव सानप (वय ८५) यांचे ४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, दिर, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर येथील न. प. खटोड शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक स्व. शामराव सनप यांच्या त्या पत्नी होत.

## लिलाबाई भळगट यांचे वृद्धापकाळाने निधन

पुणे – पुणे येथील रहिवासी श्रीमती लिलाबाई शेषमल भळगट (पुनावाला) (वय ८६) यांचे २ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे वैकुंठधाम कात्रज येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अशोक, मदनलाल कटारिया सर (सलाबतपूर) यांच्या त्या मोठ्या बहिण, अमृत, डॉ. शांतीलाल, सीए अक्षय, अ‍ॅड. हर्षद, वैभव यांच्या आत्या होत.

## बक्षीसपत्र केल्याच्या रागातून महिलेवर हल्ला; गुन्हा दाखल

नगर – वडिलांनी शेतजमीन बक्षीसपत्र करून दिल्याच्या रागातून एका महिलेला दोघांनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच हातातील कड्याने मारहाण केल्याची घटना वडगाव गुप्ता (ता. नगर) शिवारातील वनराई कॉलनी परिसरात घडली.

अनिता सुर्यभान भांड (वय ४१, रा. वडगाव गुप्ता) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांच्यावर येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू असताना दिलेल्या जबाबावरून एकरूखे, शिर्डी (ता. राहाता) येथील दोघांविरूध्द २ सप्टेंबर रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. बाबासाहेब राधोजी दातीर व अनिकेत बाबासाहेब दातीर (दोघे रा. एकरूखे, शिर्डी, ता. राहाता) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास वनराई कॉलनीजवळ ही घटना घडली. फिर्यादी अनिता भांड यांच्या वडिलांनी त्यांना शेतजमीन बक्षीसपत्र करून दिली होती. याचा राग संशयित आरोपींना असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याच कारणातून संशयित आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला आवाज देऊन थांबविले. यानंतर अनिकेत दातीर याने हातातील कड्याने फिर्यादीच्या डोक्यात व कपाळावर मारहाण केली. त्यामुळे त्यांना दुखापत झाली. तसेच बाबासाहेब दातीर यानेही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. दोघांनीही फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## रेल्वे स्टेशन परिसरात घरात सुरु असलेल्या कुंटणखान्यावर छापा

### २ महिलांची सुटका, कुंटणखाना चालवणाऱ्या महिलेला पोलिसांकडून अटक

नगर – शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात एका घरात सुरु असलेल्या कुंटणखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकत २ महिलांची सुटका केली असून कुंटणखाना चालवणाऱ्या महिलेला अटक केली आहे. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.



अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करून अवैध व्यवसायांचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आले होते.

३ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, संजीवनी कॉलनी, पानसरेवाडा, रेल्वे स्टेशन परिसर, अहिल्यानगर येथील एका घरात महिलाकरवी कुंटणखाना (वेश्याव्यवसाय) चालवला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने पंचासमक्ष खात्री करण्यासाठी एका पोलीस अंमलदाराला बनावट ग्राहक म्हणून त्या ठिकाणी पाठवले. वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पथकाने पंचासमक्ष छापा टाकून झिनत फैय्याजअली महंमद (वय ४४, रा. संजीवनी कॉलनी, पानसरेवाडा, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) या महिलेला ताब्यात घेतले.

ताब्यातील महिलेच्या घराची झडती घेतली असता त्या ठिकाणी २ महिला मिळून आल्या. चौकशी केली असता, आरोपी झिनत फैय्याजअली महंमद हिने त्यांना वेश्या व्यवसायासाठी आणल्याचे आणि ग्राहकांकडून स्वतः पैसे घेऊन त्यातील काही भाग त्यांना देऊन त्यांच्याकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत त्या दोन पीडित महिलांची सुटका केली.

आरोपी महिला झिनत फैय्याजअली महंमद ही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी महिलांकडून कुंटणखाना चालवून आपली उपजीविका करत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी तिचेविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात स्त्रिया व मुली यांचे अनैतिक व्यापारास प्रतिबंधक कायदा, १९५६ च्या कलम ३, ४, ५, ७ व ८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली.

## अहिल्यानगरमध्ये अवैध गुटखा व मावा विक्रेत्यांवर कारवाई

### पाथर्डी, एमआयडीसी आणि कोतवाली हद्दीत ४ ठिकाणी छापे, ५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर – अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथके तयार करून अवैध गुटखा, मावा व सुगंधी तंबाखू विक्रेत्यांचा शोध घेण्यासाठी रवाना केले होते.२ आणि ३ सप्टेंबर रोजी या पथकाने पाथर्डी, एमआयडीसी आणि कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत कारवाई करत सुगंधी तंबाखू, मावा व गुटखा तयार करून विक्री करणाऱ्या चार वेगवेगळ्या ठिकाणांवर छापे टाकले. या कारवाईत एकूण ११ आरोपींविरुद्ध चार गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ५ लाख ३० हजार १४६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


जिल्ह्यात ४ ठिकाणी छापे टाकून गुटखा व पान मसाला पकडल्यानंतर आरोपी समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत आकाश अशोक चातुर (रा. कजबा पाथर्डी) आणि नेहाल शफिक आतार (रा. भवानी चौक, पाथर्डी) यांच्यासह फरार असलेल्या फरदीन रफीक शेख आणि रिजवान अमीन शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पथकाने तेथून ८१ हजार ४०० आणि १ लाख १८ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय एमआयडीसी हद्दीतील वडगाव गुप्ता आणि बोल्हेगाव परिसरात छापा टाकून अमोल सुनील शिंदे व शफिक यासीन शेख यांना ताब्यात घेण्यात आले, तर गणेश कोलते व किशोर कोलते हे फरार झाले असून या कारवाईत २ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अर्शद बाबा बागवान याला ताब्यात घेऊन आणि जाहिब व शोयेब मुश्ताक खान या दोघा फरार आरोपींसह ९८ हजार २७६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अश्या प्रकारे जिल्ह्यात एकूण चार ठिकाणी छापे टाकून ११ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, अतुल लोटके, राहुल द्वारके, सागर ससाणे, रोहित येमुल, गणेश लोंढे, निळकंठ रंगनाथ कारखेले, रणजित जाधव, सतिष भवर, बाळासाहेब गुंजाळ यांच्या पथकाने पार पाडली आहे.

## डीजे ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका घेणाऱ्या विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

नगर – सार्वजनिक उत्सवांमध्ये डीजे व लाऊडस्पीकरमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका मांडणारे पर्यावरणप्रेमी विद्यानंद बापट यांना पुण्यातील टिळक रोडवरील कशाळे चौकात ३ सप्टेंबर रोजी बेदम मारहाण झाल्याची घटना घडली. या घटनेचा हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी तीव्र निषेध केला असून हल्लेखोरावर कठोर कारवाईची मागणी मुख्यमंत्र्यांकडे ई–मेल निवेदनाद्वारे केली आहे.

ध्वनीप्रदूषण ही गंभीर सामाजिक व पर्यावरणीय समस्या असून, त्याविरोधात भूमिका मांडणाऱ्या पर्यावरणप्रेमींवर अशा प्रकारे हल्ला होणे अत्यंत निषेधार्ह आहे, असे ललवाणी यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन बापट यांच्यावर हल्ला करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधितांना तातडीने योग्य त्या कारवाईच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## ‘भारत : द इटर्नल’मधून चिरंतन भारताचा वैचारिक प्रवास उलगडणार!

### युवा साहित्यिक स्वप्नील खामकर यांच्या सहाव्या पुस्तकाचे ६ सप्टेंबरला प्रकाशन

नगर – भारतीय संस्कृती, विचारपरंपरा, तत्त्वज्ञान आणि मानवतेच्या सार्वत्रिक दृष्टिकोनाचा व्यापक वेध घेणारे युवा साहित्यिक तथा उद्योजक स्वप्नील खामकर यांच्या ‘भारत : द इटर्नल’ या सहाव्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.



रविदासीया फाऊंडेशन (मुंबई) यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आ. संग्राम जगताप आणि आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभ्युदय को–ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष संदीप घनदाट, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर आणि युवा नेते अमन आंबेडकर उपस्थित राहणार आहेत.

‘भारत : द इटर्नल’ या पुस्तकातून भारताकडे केवळ भौगोलिक राष्ट्र किंवा प्राचीन संस्कृती म्हणून न पाहता, हजारो वर्षांची वैचारिक, आध्यात्मिक आणि मानवी परंपरा असलेली चिरंतन सभ्यता म्हणून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय विचारांमधील मानवतावाद, सार्वत्रिकता, अहिंसा, वेदान्ताचा व्यापक दृष्टिकोन, जागतिक शांतता आणि मानवएकतेची संकल्पना यांचा पुस्तकात अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे. भारताच्या ज्ञानपरंपरेने जगाला दिलेल्या विचारांचा आधुनिक जगाशी असलेला संबंध, भारतीय तत्त्वज्ञानातील मानवकेंद्री दृष्टिकोन आणि भविष्यातील जागतिक समाजासाठी भारतीय विचारांचे महत्त्व यावरही पुस्तकातून प्रकाश टाकण्यात आला आहे.

भारताच्या भूतकाळाचा केवळ गौरव करण्याऐवजी, चिरंतन भारतीय विचारपरंपरेतून वर्तमान आणि भविष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन या पुस्तकातून मांडण्यात आला आहे. त्यामुळे हे पुस्तक भारताच्या सभ्यताविषयक आणि वैचारिक प्रवासाचा व्यापक पट उलगडणारे ठरणार आहे.

‘भारत : द इटर्नल’ हे स्वप्नील खामकर यांचे सहावे प्रकाशित पुस्तक आहे. यापूर्वी त्यांची ‘८ : द गेम इज ऑन’, ‘द सीईओ ऑफ द माइंड’, ‘झिरो टू लॉन्च’, ‘लोकनेते सिताराम घनदाट (जिओग्राफी)’ आणि ‘द बोरिंग रेव्होल्यूशन’ ही पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. लेखनासोबतच स्वप्नील खामकर हे उद्योजक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या लेखनातून वैयक्तिक विकास, विचारशक्ती, उद्योजकता, समाज आणि भारताच्या व्यापक वैचारिक प्रवाहाचा विविध अंगांनी वेध घेण्यात आला आहे.

एप्रिल २०२५ मध्ये स्वप्नील खामकर यांना लंडन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ‘द प्रॉब्लेम ऑफ द रुपी’ या महत्त्वपूर्ण ग्रंथाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत शासकीय अधिकारी, तज्ज्ञ, मान्यवर आणि लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते. खामकर यांचा सहभाग त्यांच्या वैचारिक व सार्वजनिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. युवा साहित्यिक स्वप्नील खामकर हे महाराष्ट्रातील दुसरे पारंपरिक पद्धतीने प्रकाशित झालेले लेखक असल्याचे नमूद केले जाते. ‘भारत : द इटर्नल’च्या प्रकाशनामुळे त्यांच्या लेखनप्रवासातील आणखी एक महत्त्वपूर्ण अध्याय सुरू होणार असून, भारतीय विचारपरंपरा, संस्कृती आणि समकालीन भारतावरील वैचारिक लेखनाचा यामध्ये समावेश आहे.

या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी, विचारवंत आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रविदासीया फाऊंडेशनचे संस्थापक संजय खामकर आणि प्रदेशाध्यक्ष सुभाष मराठे यांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज लिंबू पाणी प्यायल्याने लिव्हर साफ होते का?

रोज सकाळी लिंबू पाणी प्यायल्याने लिव्हर साफ होते असा प्रचार सध्या मोठ्या प्रमाणात होत आहे, यात अर्धसत्य आहे. लिंबामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट भरपूर असल्याने लिव्हरमधील टॉक्सिन बाहेर काढण्यास मदत होते, पचन सुधारते आणि फॅटी लिव्हरमध्ये चरबी कमी होण्यास उपयोग होतो. मात्र फक्त लिंबू पाण्याने लिव्हर पूर्ण साफ होत नाही. जर तुम्ही तेलकट खाणे, बाहेरचे खाणे आणि दारू चालू ठेवली तर लिंबू पाण्याचा काहीच फायदा होणार नाही. लिव्हर खरोखर निरोगी ठेवायचे असेल सर्वात महत्वाचे म्हणजे दारू आणि सिगारेट पूर्णपणे बंद करा, जेवणात पालेभाज्या, फळे, मोड आलेले कडधान्य यांचा समावेश करा, रात्रीचे जेवण हलके आणि वेळेवर घ्या, लिंबू पाणी पिण्याची योग्य पद्धत म्हणजे सकाळी उठल्यावर एक ग्लास कोमट पाण्यात अर्धे लिंबू पिळावे, त्यात चिमूटभर सैंधव मीठ आणि हवे असल्यास थोडे मध टाकावे, साखर अजिबात टाकू नये, हे पाणी हळूहळू प्यावे. दिवसातून एकदाच पिणे पुरेसे आहे, दिवसभर सारखे लिंबू पाणी पिऊ नये. ज्यांना अल्सर आहे, छातीत खूप जळजळ होते, ॲसिडिटीचा त्रास आहे, दातांची झीज झाली आहे त्यांनी डॉक्टरांना विचारल्याशिवाय रोज लिंबू पाणी पिऊ नये, त्यांनी स्ट्रॉने प्यावे आणि प्यायल्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरावी. थोडक्यात सांगायचे तर लिंबू पाणी हे लिव्हरसाठी एक चांगला मित्र आहे, चांगल्या सवयी आणि चांगला आहार हाच लिव्हर साफ ठेवण्याचा खरा मंत्र आहे.

## पाककला

### लसूणी भात

**साहित्य :** शिजलेला भात २ वाटी, लसूण पाकळ्या २०-२५, बारीक चिरलेला कांदा १ मोठा, बारीक चिरलेली हिरवी मिरची २-३, किसलेला आलं १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, मोहरी १/२ चमचा, हळद १/४ चमचा, लाल तिखट १ चमचा, गरम मसाला १/४ चमचा, तेल ३ चमचे, तूप १ चमचा, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, लिंबाचा रस १/२ चमचा

**कृती :** प्रथम भात मोकळा करून घ्या, जेणेकरून त्याच्या गुठळ्या होणार नाहीत. कढईत तेल आणि तूप गरम करा. त्यात मोहरी, जिरे टाकून तडतडा येऊ द्या. नंतर भरपूर ठेचलेला लसूण आणि आलं घालून खमंग वास येईपर्यंत आणि हलका गुलाबी रंग येईपर्यंत परता, त्यात चिरलेला कांदा आणि हिरवी मिरची घालून कांदा पारदर्शक होईपर्यंत परता. आता त्यात हळद, लाल तिखट, गरम मसाला आणि चवीनुसार मीठ घालून मसाला मिक्स करा. गॅस अगदी मंद ठेवा आणि मगच शिजलेला भात घाला. भात फोडू नका, हलक्या हाताने दोन चमच्याने वरखाली करत मिक्स करा जेणेकरून प्रत्येक शिताला लसणाचा तडका लागेल. ३-४ मिनिटे मंद आचेवर झाकण ठेवून वाफ काढा, म्हणजे लसणाचा फ्लेवर भातात उतरेल. आता गॅस बंद करून त्यावर लिंबाचा रस आणि भरपूर बारीक चिरलेली कोथिंबीर घाला.

## सौंदर्य

### नाकावरचे ब्लॅकहेडस्

एक चमचा बेसन, चिमूटभर हळद आणि थोडे कच्चे दूध मिसळून नाकावर २ मिनिटे घासा. आठवड्यातून दोन वेळा हाच उपाय केला तर ब्लॅकहेड्स परत येत नाहीत. ब्लॅकहेड्स काढल्यानंतर लगेच चेहरा थंड पाण्याने धुवा किंवा बर्फाचा तुकडा नाकावर फिरवा म्हणजे छिद्रे बंद होतील.

## वास्तू

टॉयलेट ही नकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी जागा आहे. वास्तुनुसार जिन्याखाली टॉयलेट असल्यामुळे कर्जबाजारीपणा येतो.

## सल्ला

तूर डाळ / मूग डाळीसाठी पहिल्या शिट्टीनंतर मंद आचेवर ८ ते १० मिनिटे ठेवा. डाळ अजिबात कच्ची राहणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६

**गोपाळकाला, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, मृग २१।३१, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज अचानक धनलाभ होईल. जुने अडकलेले पैसे परत मिळतील.

**वृषभ :** आज घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. खर्च वाढेल पण आनंदही वाढेल.

**मिथुन :** आज कामात यश मिळेल. वरिष्ठ तुमच्या कामावर खुश होतील.

**कर्क :** आज मन थोडे अस्वस्थ राहील. प्रवासात अडथळे येतील.

**सिंह :** आज नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. व्यवसायात मोठा फायदा होईल.

**कन्या :** आज आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. पोटाचे विकार त्रास देतील.

**तुळ :** आज जोडीदारासोबत वाद होईल. नात्यात दुरावा येईल.

**वृश्चिक :** आज कोर्ट-कचेरीच्या कामात विजय मिळेल. शत्रू पराभूत होतील.


**धनु :** आज मुलांकडून चांगली बातमी मिळेल. शिक्षणात प्रगती होईल.

**मकर :** आज नोकरीत बदली किंवा प्रमोशनचे योग आहेत. जबाबदारी वाढेल.

**कुंभ :** आज अचानक मोठा खर्च समोर येईल. कर्ज घेण्याची वेळ येईल.

**मीन :** आज प्रेम संबंधात गोडवा वाढेल. लग्नाचे योग जुळून येतील.

## शब्दगंध क्र. ७५०९ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) व्याकूळ ४) संपत्ती; धन; वित्त ६) सूट, डिस्काउंट ७) सर्कशीतील शरीराच्या विशिष्ट हालचाली ८) मागणीचा लकडा १०) मध्यम; सरासरी; सामान्य ११) एक पक्षी; बक १३) फळातील रसाळ भाग; मगज १४) आवश्यकता; गरज; जरुरी १५) पिसारा फुलविणारा पक्षी १६) एक अधिक पाव १८) समाधी; थडगे; मकबरा २०) क्रिकेटमधील बॉलर; तोफ डागणारा २२) रडका; रडवेला २३) शिवण; पाठीचा मणका

**उभे शब्द :-** १) कोणत्याही ऋतूतील हवामान सहन करणाऱ्या शरीरयष्टीचा २) स्मरणात न ठेवणारा; विसरणारा ३) नवऱ्याची दुसरी बायको ४) मध्ये खंड न पडता एकसारखी पडणारी धार ५) पांगापांग; वाताहत ९) थंड; शीत १०) समुद्रातील गुळगुळीत गोल दगड; गजगा ११) बागकाम करणारा; बागवान; फुलधर; माळी १२) गोंधळ; गलबला; गदारोळ; गलका १६) नेहमी; हमेशा १७) योग्य; रास्त १९) गव्हाचे कणीदार पीठ २१) रावणाची सोन्याची नगरी

**शब्दगंध क्र. ७५०८ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२५२ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** पैशाने सुख विकत घेता येतं, पण समाधान नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपल्याला हे आधीच घडलंय असे का वाटते? कधी तुमच्यासोबत असं झालंय का?

तुम्ही आयुष्यात पहिल्यांदाच एखाद्या नव्या ठिकाणी गेला आहात, एखाद्या अनोळखी व्यक्तीशी बोलत आहात आणि अचानक एका क्षणासाठी मनात जोरात वाटतं की अरे, हे सगळं मी आधीच पाहिलंय, हाच प्रसंग आधीच घडलाय! तुम्हाला खात्री आहे की तुम्ही तिथे पहिल्यांदाच गेला आहात, तरीही मन काही मानत नाही. या विचित्र पण नेहमी येणाऱ्या अनुभवाला पुर्वानुभवाचा भास असे म्हणतात.

जगातील जवळपास सत्तर टक्के लोकांना आयुष्यात एकदा तरी हा भास होतो. विशेषतः पंधरा ते पंचवीस वयोगटातील तरुणांना आणि जास्त प्रवास करणाऱ्या लोकांना हा अनुभव जास्त येतो. मग हे का घडते? यात कसलीही जादू किंवा चमत्कार नाही, हा आपल्या मेंदूतील एक छोटासा गोंधळ आहे. आपल्या मेंदूत आठवणींसाठी दोन वेगळ्या व्यवस्था काम करतात. एक आहे ओळख पटवणारी व्यवस्था आणि दुसरी आहे सविस्तर आठवण काढणारी व्यवस्था. नेहमी जेव्हा आपण एखाद्या मित्राला भेटतो, तेव्हा दोन्ही व्यवस्था एकत्र काम करतात. ओळखही पटते आणि त्याच्याबद्दलच्या जुन्या गोष्टीही आठवतात. पण या भासाच्या वेळी काय होते? नवे ठिकाण पाहताना फक्त ओळख पटवणारी व्यवस्था चुकीने सुरू होते, पण सविस्तर आठवण देणारी व्यवस्था बंदच राहते. त्यामुळे तुम्हाला वाटते की हे ओळखीचे आहे, पण ते कुठे आणि कधी पाहिले हे काही आठवत नाही. हा मेंदूतील विजेचा छोटा बिघाड आहे.

दुसरे कारण म्हणजे नजरेची दुटप्पी कामगिरी. समजा तुम्ही एका खोलीत शिरलात, तुमची नजर एका क्षणासाठी टेबलावर गेली, पण तुमचे लक्ष नव्हते. काही क्षणांनी तुम्ही पुन्हा त्याच टेबलाकडे लक्ष देऊन पाहिले, तेव्हा मेंदूला वाटते की मी हे टेबल दुसऱ्यांदा पाहतोय. पहिल्यांदा पाहिल्याची आठवण पुसट असल्यामुळे ते खूप जुने वाटते.

तिसरे कारण म्हणजे आठवणींचा प्रवास. कोणतीही नवी माहिती आधी काही वेळ आपल्या तात्पुरत्या आठवणीत राहते आणि मग ती कायमच्या आठवणीत जाते. कधी कधी खूप थकवा आल्यावर, झोप कमी झाल्यावर किंवा मनावर ताण आल्यावर ही नवी माहिती थेट कायमच्या आठवणीत जाते. मग मेंदू गोंधळतो आणि समजतो की ही माहिती कायमच्या आठवणीत आधीपासूनच होती, म्हणजे ही जुनीच असणार. त्यामुळे घाबरून जाण्याचे काही कारण नाही.

हा कोणताही आजार नाही. उलट हा निरोगी मेंदूचे लक्षण आहे, जो आपल्या आठवणी सतत तपासत असतो. त्यामुळे पुढच्या वेळी तुम्हाला असे वाटले की हे आधी घडलंय, तर समजा की तुमच्या हुशार मेंदूने केलेला हा एक छोटासा पण गमतीशीर गोंधळ आहे.

### खिळ्यांनी भरलेली भिंत

एकदा एका वडिलांना आपल्या मुलाचा खूप राग यायचा. तो मुलगा छोट्या छोट्या गोष्टींवरून सगळ्यांवर रागवायचा, शिव्या द्यायचा, भांडण करायचा. वडिलांनी त्याला समजावून खूप थकले. एक दिवस वडिलांनी त्याला एक पिशवी भरून खिळे आणि एक हातोडी दिली. म्हणाले, जेव्हा जेव्हा तुला राग येईल, तेव्हा तू आपल्या घराच्या मागच्या लाकडी भिंतीत एक खिळा ठोकायचा. पहिल्या दिवशी मुलाने २० खिळे ठोकले. दुसऱ्या दिवशी १५, तिसऱ्या दिवशी १०. हळूहळू त्याला कळले की राग आवरणे हे खिळा ठोकण्यापेक्षा सोपे आहे. काही आठवड्यांत असा दिवस आला की त्याला एकदाही राग आला नाही.


तो धावत वडिलांकडे गेला. वडील म्हणाले, शाब्बास! आता जेव्हा जेव्हा तू रागावर नियंत्रण मिळवशील, तेव्हा एक एक खिळा काढून टाकायचा. मुलाने रोज एक एक खिळा काढायला सुरुवात केली. काही महिन्यांनी सर्व खिळे निघाले. भिंत मोकळी झाली. मुलाला खूप आनंद झाला.

वडिलांनी त्याला भिंतीजवळ नेले आणि म्हणाले, बघ, खिळे तर निघाले, पण भिंतीला पडलेले छेद बघ. भिंत पूर्वीसारखी राहिली का? मुलगा काहीच बोलला नाही.

वडील म्हणाले, तसेच असते. तू रागात दुसऱ्याला जे बोलतोस, ते खिळ्यासारखे असते. नंतर तू माफी मागितलीस तरी समोरच्या व्यक्तीच्या मनावर छेद पडलेलेच राहतात. म्हणून राग येण्याआधीच स्वतःला सावरायला शिक. त्या दिवसापासून त्या मुलाने राग सोडून दिला.

तात्पर्य : माफी मागितल्याने खिळा निघतो खरा, पण मनावर झालेली जखम तशीच राहते.

## आत्मशक्ति



### त्यांच्या प्रती अकर्षित होणे

अशा शरीरात आमचा अमर आत्मा राहतो. जेव्हा आत्मा शरीराला जोडून असतो त्याला सुखदु:खाची जाणीव होते. जो पर्यंत हा टिकून चालू असतो तोपर्यंत कोणीही मनुष्य सुखदु:खापासून मुक्त होत नाही.'(छांदोग्य उपनिषद ८.१२ - १)सूक्ष्म असा हा आत्मा जड पदार्थात स्वतःला हरवून बसतो. त्याचा क्षीण आवाज ऐकला जात नाही. कारण मन आपल्या अत्यंत जबरदस्त सांसारिक गतिविधींनी आत्म्याला वश करून ठेवतें. आत्म्याचा पराभव कसा झाला ?आत्मा फार शक्तिशाली असतो. मग तो मन आणि इंद्रियांच्या आहारी का जातो? याचे उत्तर म्हणजे आत्म्याचे बाह्य रुप ध्यान, लक्ष. आमचे सारे लक्ष मन आणि इंद्रियांमुळे रंगीबेरंगी दुनियेकडे लागलेले असते.

कल्पना करा जेव्हा एखादा बालक प्रथमतःच एका यात्रेत फिरत आहे. पूर्ण यात्रेत फिरताना आईवडील त्याचा हात पकडून ठेवतात. परंतु बालक ह्या झोक्याकडे तर कधी दुसऱ्या झोक्याकडे जाण्याचा हट्ट करते. आईवडिलांना त्याला खुश ठेवायचे असते. त्यामुळे त्यांचेही लक्ष कधी ह्या तर कधी त्या झोक्याकडे आकर्षित होते. अशाच प्रकारे आमचे लक्ष एका बाह्य प्रलोभनाकडून दुसऱ्या कडे जाते. परिणामी आत्म्याचा लगाम मनाच्या ताब्यात जातो. जरी आत्म्याने आपली शक्ति - लक्ष काढून घेण्याचे ठरवले तरी मनाची बाहेर लक्ष देण्याची सवय दृढ झाल्याने आत्म्याला मनावर ताबा ठेवणे अतिशय कठीण होते.मनाच्या सवयी पक्क्या होत जातात. ह्या सवयी सोडणे किती कठीण जाते हे आपण जाणतोच. जे लोक दारू पितात, धुम्रपान करतात त्यांना त्या सवयी सोडणे फारच कठीण वाटते. ह्या सवयी आरोग्याला अतिशय हानीकारक आहेत हे माहिती असतानाही हे घडते!

आमच्यापैकी काही लोक कामावर जाण्यासाठी निश्चित वेळी उठतात. सुट्टी असेल तेव्हा आवश्यकता नसतानाही ते त्याच वेळी उठतात. अशाच काही सवयी असतात ज्या सोडणे कठीण जाते. अशाप्रकारे मनाला बाहेरच्या जगात लक्ष केंद्रित करण्याची सवय जडते.जर आम्ही आपले ध्यान नियंत्रित करून अंतरी टिकविले तर आमच्या आत्म्याला बलशाली बनवू शकतो. तेव्हा आत्मा शरीररूपी घराचा मालक बनेल व अंतरी दडलेल्या नामरूपी धनाची प्राप्ति करू शकेल. **(क्रमश:)**

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आशिर्वाद घेताना

शिवानीदीदी : हो, अपमानास्पद. पालक स्वतःला परवानगी देतात की मुलं लहान आहेत तर त्यांना मार देऊन आपल्या ताब्यात ठेवता येईल.

सुरेश ओबेरॉय : जेव्हा बायको आता बास म्हणते किंवा मूल मी उलटवार करेन अशी धमकी देतं तेव्हा गोष्टी बदलतात हे मी बघितलं आहे. एकदा मी माझ्या पाळलेल्या कुत्र्यावर चिडलो होतो. म्हणून तो पलंगाखाली गेला आणि अनेक तास त्याने आमच्या हाकांना प्रतिसाद दिला नाही. मी त्याला मनवण्याचा प्रयत्न केला तरीही त्याने काही खाल्लं नाही. प्राणीही दुखावले जातात.

शिवानीदीदी : जेव्हा मोठी माणसं मुलांना मारतात तेव्हा ते त्यांचा विकसितही न झालेला स्वाभिमान चिरडतात. त्याचा सन्मान दुखावतात. त्याच्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघू या. हाच आत्मा एक वर्षापूर्वी एका म्हाताऱ्याच्या शरीरात होता जो कदाचित कुटुंबप्रमुख असेल.

सुरेश ओबेरॉय : आणि त्याला आदर मिळण्याची सवय असेल.

शिवानीदीदी : समजा, आपल्याला सगळ्यांकडून आदर मिळण्याची सवय असेल आणि मग आपण एखाद्या अशा ठिकाणी जातो जिथे संपूर्णतः विरुद्ध तरंग मिळतात. आपल्याला आतून कसं वाटेल ? जेव्हा तो आत्मा एका मोठ्या माणसाच्या शरीरात होता तेव्हा लोक त्याचं ऐकत होते, त्याचं मत आणि आशीर्वाद घेत होते. आता शरीर बदलल्यानंतर, तो एका बाळाच्या पोशाखात आहे म्हणून त्या आत्म्याला सारखं रागवलं जातंय किंवा मारलंही जातंय. याचा त्या आत्म्यावर काय परिणाम होईल ?

सुरेश ओबेरॉय : हे आयुष्यातही घडतं. सुरुवातीला वडिलांचं ऐकलं जातं, त्यांना आदर दिला जातो. नंतर मुलगा त्यांच्या मतांना जुनीपुराणी म्हणून नाकारतो.

शिवानीदीदी : पण जेव्हा हे आपल्या आयुष्यात घडतं आणि आपण सगळं काही समजण्याएवढे मोठे होतो तेव्हा आपण परिस्थिती समजून घेऊ शकतो. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, या बाबत आपण कोणाशीतरी बोलू शकतो.

सुरेश ओबेरॉय : काळानुसार गोष्टी स्वीकारतोही.शिवानीदीदी : हो, पण बाळाला व्यक्त होता येत नाही. मी दुखावलो गेलोय, इतकं त्याला सांगताही येत नाही. एका सामाजिक कार्यक्रमात, दहा वर्षांखालच्या मुलांना आम्ही व्यासपीठावर बोलावलं. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र म्हणाला, तू एवढा शांत कसा राहतोस? मी म्हणालो, अपेक्षा कमी केल्या. तो म्हणाला, मग आयुष्य सोपं झालं?
मी म्हणालो, हो, आता लोकांनी काही केलं नाही तरी आश्चर्य वाटत नाही!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्र पोलीस ध्वजाचा रंग कोणता?

– निळा आणि लाल

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कुळीथ

१३) कुळथाच्या पिठाला जिरे, मोहरी, लसूण, तिखट व हिंग यांची तेलामध्ये फोडणी देऊन पिठले बनवावे. हे पिठले ज्वारीच्या भाकरीसोबत किंवा पोळीसोबत खावे. याची चव अत्यंत रुचकर असून, ते पौष्टिकही आहे.

सावधानता : कुळीथ हे पित्तकारक, विदाही, उष्ण व तीक्ष्ण असल्याने गर्भवती स्त्रियांनी, पित्तप्रकृती असणाऱ्यांनी, तसेच रक्तपित्त झालेल्यांनी त्याचा उपयोग सहसा करू नये.

### तीळ

तीळ म्हटलं, की मकर संक्रांतीच्या तिळगुळाची हमखास आठवण येते. एकमेकांचे सुख-दु:ख जाणून स्नेह वाढावा, यासाठी मकर संक्रांतीला तिळगूळ वाटण्याची प्रथा आहे. तीळ हा स्निग्ध व उष्ण गुणात्मक असतो. त्यामुळे शरीरातील कोरडेपणा कमी होतो. गूळ हा चवीला मधुर, स्निग्ध गुणाचा व रक्त वाढविणारा असतो. म्हणून संक्रांतीला थंडीचा प्रतिकार करण्याची क्षमता शरीरात निर्माण करून आरोग्य जपण्यासाठी तिळगूळ खावा, असे आयुर्वेदात सांगितले आहे. मराठीत 'तीळ', संस्कृतमध्ये 'तिल', तर शास्त्रीय भाषेत 'पेडालिएसी' या कुळातील आहे.

भारतातमध्ये तिळाची लागवड जास्त प्रमाणात होते. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेशामध्ये तिळाची लागवड केली जाते. तिळाचे रोप साधारणतः दोन हात उंच असते. त्याचे रोप रंगाने हिरवे असते. तिळामध्ये तेलाचे प्रमाण साधारणतः ५०% असते. आयुर्वेदानुसार तीळतेलामध्ये औषधी गुणधर्म जास्त असल्यामुळे पंचकर्म उपचार करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. काळे, पांढरे आणि लाल असे तीन रंगांचे तीळ असतात. तीळ चवीला तुरट, किंचित कडू, तिखट व मधुर असून, कटुविपाकी व उष्ण आहेत. तसेच ते अत्यंत स्निग्ध असून वातघ्न, पित्तकफकर, बुद्धिवर्धक व केशवर्धक आहेत. गुणधर्माने काळे तीळ हे श्रेष्ठ, पांढरे तीळ मध्यम आणि लाल तीळ कनिष्ठ प्रकारचे असतात.

आधुनिक शास्त्रानुसार : तिळामध्ये कॅल्शिअम, लोह व 'ब' जीवनसत्त्व विपुल प्रमाणात असते. पांढऱ्या तिळात कॅल्शिअम भरपूर प्रमाणात असते. म्हणून कॅल्शिअम कमतरतेवर पांढरे तीळ खावेत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



साई कथेचे निरुपण करताना माधुरीताई शिंदे.

# केडगावात साई चरित्र पारायण सोहळ्याची सांगता

### साई पालखी मिरवणुकीने वेधले भाविकांचे लक्ष

नगर – केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा फाऊंडेशनच्या साईबाबा मंदिराच्या तेराव्या स्थापना दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह आयोजित साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याची भक्तीमय वातावरणात सांगता झाली. या सोहळ्यास केडगाव परिसरातील साईभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रारंभी शाहूनगर परिसरातून साईबाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पालखी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. टाळ–मृदंगाचा गजर, साईनामाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. साईभक्तांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. मध्यान आरती नगरसेवक अमोल येवले, नगरसेविका वर्षा काकडे यांच्या हस्ते करण्यात आली. काकड आरती दिलीपशेठ नागरे यांच्या हस्ते, तर सकाळची आरती अशोकराव सोनार यांच्या हस्ते करण्यात आली. साईकथाकार माधुरीताई शिंदे यांच्या प्रवचनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. साई सच्चरित्र ग्रंथ पारायणाच्या समारोपप्रसंगी साईंची धुपारती उद्योजक राजेश जग्गी व जयद्रथ खाकाळ यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली.

यावेळी बोलताना साईकथाकार माधुरीताई शिंदे म्हणाल्या, धार्मिक कार्यातून मनाला मानसिक समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळते, तेथेच परमेश्वराचे अस्तित्व अनुभवायला मिळते. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने माणूस आपल्या गावापासून दूर जातो. मात्र नवीन ठिकाणी मंदिराची उभारणी करून सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य ही भारतीय संस्कृतीची मोठी ताकद आहे. भारतीय संस्कृतीने देवाचे स्वरूप निसर्गाशी जोडले असून, अध्यात्मामुळे मन प्रसन्न होते आणि नकारात्मक विचार दूर होतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी फाऊंडेशनचे सदस्य डॉ. मुकुंद शेवंगावकर, प्रकाश वाघ, अशोक झिने, अजितसिंग दडियाल, चंद्रशेखर मलिकपेटकर, बाळासाहेब देशमुख, रविंद्र देशपांडे, अजित कातोरे, अशोक जाधव, कावेरी जाधव, दडियाल भाभी, प्रकाश चांदेकर, संजय बोरगे, योगेश गुंजाळ, पुरुषोत्तम भूकन, विनायक कावरे, मारुती भिडे, रमेश शहाणे, किर्ती नवले, इंदुमती सातपुते, व्यासपीठ वाचक श्रीनिवास सहदेव यांच्यासह परिसरातील साईभक्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक झिने यांनी केले.

# सार्वजनिक उत्सवांमध्ये जल्लोष करण्यासाठी हेडफोनचा वापर व्हावा

नगर – सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये जल्लोष करण्यासाठी डीजे ध्वनीक्षेपकां ऐवजी ब्लूटूथ हेडफोन, वायरलेस एअर बडस् असे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पर्सनल ऑडिओ डिवाइस वापरण्यात यावेत, या नाविन्यपूर्ण व शांततापूर्ण उत्सव संकल्पनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री. ललवाणी यांनी म्हटले आहे की, आपले महाराष्ट्र राज्य हे सण, उत्सव व धार्मिक परंपरा असलेले राज्य आहे. विविध सार्वजनिक उत्सव व सणानिमित्त नागरिक मोठ्या उत्साहाने एकत्र येतात. मात्र अलीकडील काळात सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये कार्यकर्ते जल्लोष करण्यासाठी मोठ्या कर्कश्य व असह्य आवाजाचे डीजे डॉल्बी ध्वनिक्षेपक वापरतात. या कर्कश आवाजातून सहभागी कार्यकर्त्यांना आनंद व उत्साह मिळत असला तरी नजीकच्या ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण व इतर नागरिकांना या कर्कश ध्वनी प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. असह्य आवाजामुळे अनेकदा जीवित हानी झालेली आहे.

या सर्व बाबींचा विचार करता ब्लूटूथ हेडफोन वायरलेस इयर बडस् व पर्सनल ऑडिओ डिवाइस हा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शांततापूर्ण उत्सव साजरा करण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

### माणसाचा जन्म लाभणे ही पर्वणी




संकलन: दिशान फिचर्स

शाहीर रामजोशी म्हणतात,

भला जन्म हा तुला लाभला
खुलास हृदयी बुधा धरिसि तरि
हरिचा सेवक सुधा स्वार्थसुखे परमार्थ
बुडविला अनर्थ केला बुधा

माणसाचा जन्म लाभणे, हे पुण्याईचे देणे. शहाणे होणे, स्वार्थ हे विष जाणणे, सर्वांचे दुःख हरण करणाऱ्या त्या हरीची सेवा करणे, अमृताचे जिणे. संत नामदेव म्हणतात.

दुर्लभ नरदेह झाला तुम्हाला
आम्हा हिताचिया गोष्टी सांगू एकमेका
शोक मोह दुःखा निरयू तेणे

माणूस म्हणून जन्माली येणे, ही पर्वणीच या जन्माचे भले साधणे, एकमेकांना हिताच्या गोष्टी सांगणे, एकमेकांची चिंता हुरहुर व दुःख घालवणे, यासाठीच जन्मा येणे नरजन्म लाभणे हे क्वचित घडणे. म्हणूनच या दुर्लभ जन्माचा सदुपयोग करणे. अनंत फंदी म्हणतात.

नरदेहासी येउन प्राण्या दुष्ट वासना धरु नको।। बिकट वाट वहिवाट असावी धोपट मार्ग सोडू नको। अंगि नम्रता सदा असावी राग कुणावर धरु नको ।। कष्टाची बरि भाजि भाकरी तूप साकरेची चोरि नको।। दोन दिवसाची जाईल सत्ता अपेश माथा घेउ नको ।

माणसाचा जन्म मिळाल्यावर तु दुष्ट वासनांना थारा देऊ नको. दुष्टाईचे वागणे हे श्वापदाचे जिणे. तुही प्राणी पण माणूस हे पद तुला लाभणे, त्याची सदा लाज राखणे, आडव्यातिडव्या, छलकपटकारी वागण्याचा छंद धरु नको. सरळ सर्वांना सुखदायी होईल असे वागणे सोडू नको. अंगी नम्रता असावी, कुणावर राग धरुनी रुसू नको. नम्रता फळते, रागावणे छळते.

अनंत फंदी पुढे म्हणतात, कष्ट कर फुकटाचे खायची सवय नको, भ्रम करून भाजीभाकरी लागेल ती अंगी लागेल. पण तूपरोटीसाठी चोरी करेल तो सदा दुःखाला कवटाळेल. सत्तेचा उन्माद घेणे हे अवलक्षण ठरणे. आपकीर्तीची अवदसा ओढवणे, सत्ता सदैव राहत नाही. म्हणून ती लोकहितासाठी राबवावी.

सत्तेने समता साधावी. बहुतांची दुःख बाधा हरावी. जनतेची गरिबी सरावी. अन्न निवाऱ्याची सोय व्हावी. मनुष्याला ही सुदुदी सदैव उपजावी. जन्माची हीच सार्थकता समजावी.

माणसाचा जन्म, त्यातही चांगल्या कुळांतै, वैभवदेखील नशिबात, दीर्घायुष्य आणि आरोग्य ही भर पडावी, त्यात हे सगळे त्या परमेश्वराच्या आधीन. पुण्य असले जबर, तरच या सर्व सुखसोयी लाभतील. तेव्हा माणसांच्या जन्माचे भोल, अनमोल, ते जाणा. पण दुःख, हेच, की मृत्यू जवळ आला. की मग माणसाला जीवनाची किंमत कळते.

शेखसादी एक कहाणी सागतात. एक बादशहा जहाजातून प्रवासाला निघाला. त्याचा मेव्हणा होता सोबतीला. त्याची सारखी कुरकूर चालायची. जहाज हलते, मला ओकारी येते. मग तो झोप ना, बादशालाही झोपू देईना. बादशहा त्रासला. खलाशी म्हणाले, तुम्ही याला आमच्या स्वाधीन करा. बादशहाने तसे केले. दोन दिवसात मेव्हणा सुधारला. बादशहाने मन आनंदले. पण खलाशांनी असे काय केले? त्यांनी त्याला दोर बांधून समुद्रात टाकले. मृत्यूच्या भयाने तो म्हणाला, जहान हलले तरी चालेल, ओकारी सहन करीन. न कुरकुरता स्वस्थ झोपेन. पण मला वर घ्या, वाचवा. मग त्यांनी त्याला वर घेतले.

**– किशोर गांधी**

# ऐतिहासिक भूईकोट किल्ल्याचा विकास करताना राष्ट्रध्वज स्तंभ उभारून तिरंगा फडकवण्यात यावा

नगर – १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून महान स्वातंत्र्यसेनानी आचार्य पंडित नरेंद्र देव यांच्या हस्ते भुईकोट किल्ल्यावर पहिल्यांदा तिरंगा फडकवण्यात आला होता. परंतु दुर्दैवाने, काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळामुळे हा ऐतिहासिक ध्वजस्तंभ मधोमध वाकला होता. सुरक्षेच्या कारणास्तव व राष्ट्रध्वजाचा अवमान टळावा म्हणून तो ध्वजस्तंभ काढून घेण्यात आला. मात्र, तेव्हापासून आजतागायत त्या ठिकाणी नवीन ध्वजस्तंभ उभारण्यात आलेला नाही. त्यामुळे १५ ऑगस्ट १९४७ ची ती ऐतिहासिक आठवण आणि देशाचा अभिमान असलेला तिरंगा सध्या तिथे फडकताना दिसत नाही.

अहिल्यानगर येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून महाराष्ट्र शासन आणि अहिल्यानगर लष्कर विभाग यांच्यात ऐतिहासिक सामंजस्य करार झाला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने या किल्ल्याचा कायापालट होणार असून, हा ऐतिहासिक वारसा जपण्याचा घेतलेला ध्यास नक्कीच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे. परंतु, या पर्यटन विकासाची कामे सुरु असतानाच किल्ल्याशी जोडलेल्या एका अत्यंत संवेदनशील आणि ऐतिहासिक घटनेकडे लक्ष वेधणे गरजेचे बनले आहे.

### ध्वजस्तंभाची पण पुनर्उभारणी कधी?

वादळामुळे ध्वजस्तंभ काढून घेण्यात आल्यानंतर या संदर्भात शहाजान फकीर शेख यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ई मेलद्वारे निवेदन पाठवून लक्ष वेधले होते. यावर तत्परता दाखवत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी यांनी लष्कर विभागाच्या एमआयआरसी सेंटर कमांडंटना तात्काळ दुरुस्ती करून नवीन ध्वजस्तंभ उभारण्याचे निर्देश पत्राद्वारे दिले आहेत. राष्ट्रध्वज हे आपल्या देशाच्या अस्मितेचे आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक असल्याने ही बाब अत्यंत गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

किल्ल्यावर २५ कोटींच्या निधीतून भव्य प्रवेशद्वार, तटबंदी संवर्धन, इंटरप्रिटेशन सेंटर आणि सोलर लाईटिंग यांसारख्या अत्याधुनिक सुविधा होणार आहेत. परंतु, या सर्व विकासासोबतच ज्या स्वातंत्र्याचा इतिहास या किल्ल्याशी जोडलेला आहे, त्या १५ ऑगस्ट १९४७ च्या ऐतिहासिक राष्ट्रध्वजस्तंभाची पुनर्उभारणी प्राधान्याने व्हावी. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ.सुजय विखे, आ. संग्राम जगताप आणि लष्कर प्रशासनाने या विषयात वैयक्तिक लक्ष घालून लवकरात लवकर सन्मानाने नवीन ध्वजस्तंभ उभारून त्यावर तिरंगा फडकवावा, हीच नगरकरांची आणि देशभक्तांची इच्छा आहे. असेही इतिहासप्रेमी शहाजान फकीर शेख यांनी म्हंटले आहे.

# शिक्षकाने सेवापूर्तीनंतर आरोग्य सांभाळून समाजाची सेवा करावी

### बापूसाहेब डोके यांचे प्रतिपादन



लक्ष्मीबाई डोके विद्यालयाच्या शिक्षिका मंजुळा नवगिरे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव करताना मान्यवर.

### शिक्षिका मंजुळा नवगिरे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

नगर – शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देणारा घटक नसून समाजाची भावी पिढी घडविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडणारा घटक आहे. सेवाकाळात विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी प्रामाणिकपणे योगदान देणाऱ्या शिक्षकांनी सेवापूर्तीनंतरही आपला प्रदीर्घ अनुभव समाजाच्या उपयोगी आणावा. सेवापूर्ती म्हणजे कार्याचा शेवट नसून जीवनाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. त्यामुळे आता स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत कुटुंबासोबत आनंदी जीवन जगावे आणि अनुभवाच्या माध्यमातून समाजसेवेत योगदान द्यावे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बापूसाहेब डोके यांनी केले.

निर्मलनगर येथील लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मंजुळा नवगिरे यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा गौरव करून त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बापूसाहेब डोके बोलत होते. यावेळी संस्थेच्या सचिव आशादेवी डोके, संचालक महेश डोके, प्रमुख पाहुण्या आकाशा त्र्यंबके यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सौ. मंजुळा नवगिरे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मंजुळा नवगिरे यांच्या सेवापूर्ती समारंभासाठी त्यांच्या कुटुंबीयांनीही आवर्जून उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील क्षत्रे, सोनम, आशा धामणे, संजोग बर्वे, सुजाता कर्डीले, ज्योती पवार, राणी राऊत, अभिषेक खामकर, किरण जाधव, सॉलोमन क्षेत्रे, तन्मय, अर्पण आदींसह कुटुंबीय उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे अध्यक्ष व सचिव यांच्या हस्ते सौ. मंजुळा नवगिरे यांचा विशेष सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. प्रदीर्घ काळ विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या शिक्षिकेच्या सेवेला या कार्यक्रमाद्वारे सलाम करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे यांनी केले. उपस्थितांचे आभार रिबेका क्षेत्रे यांनी मानले.




बाबावाडीतील मुलांना राख्या बांधून रक्षबंधनाचा आनंद साजरा करण्यात आला.

# बालगृहातील मुलांसोबत रक्षाबंधनाचा सण साजरा

नगर – रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त बाबावाडी मुलांचे बालगृह येथे सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बालगृहातील मुलांना राखी बांधून त्यांच्यासोबत रक्षाबंधनाचा आनंद साजरा करण्यात आला. तसेच मुलांना खाऊ व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि त्यांच्या आनंदी सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रम भावनिक व संस्मरणीय ठरला. या उपक्रमासाठी बाबावाडी मुलांचे बालगृहाचे संचालक नीलकंठ अमरापूरकर, अधीक्षिका सुमन कांबळे व सेविका शर्मिला गडाख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या वतीने तेजश्री देशमुख, दिपाली गागरे आणि अनुजा म्हस्के यांनी या सामाजिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.



पैगंबर जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा व नाअत स्पर्धेतील सहभागी विद्यार्थिनींसमवेत मान्यवर.

# पैगंबर जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले उर्दू शाळेत वक्तृत्व स्पर्धा संपन्न

नगर – मोहम्मदिया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत पैगंबर जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा व नाअत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी मखदुम एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान म्हणाले, पैगंबर हजरत मोहम्मद यांनी संपूर्ण मानवजातीला प्रेम, शांतता, दया, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांनी नेहमी सत्याची साथ देण्याची आणि गरजूंच्या मदतीला धावून जाण्याची शिकवण दिली. त्यांचे संपूर्ण जीवन हे मानवतेसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या काळात त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे. समाजात जात, धर्म किंवा भाषा यापेक्षा माणुसकीला महत्त्व देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच चांगले संस्कार आत्मसात करून समाजासाठी उपयोगी नागरिक बनावे, हीच पैगंबरांच्या शिकवणीला खरी आदरांजली ठरेल, असे ते म्हणाले.

वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थिनींनी पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे प्रेम, दया, बंधुभाव, मानवता, सत्य, प्रामाणिकपणा व सामाजिक सलोख्याचे विचार प्रभावीपणे मांडले. नाअत स्पर्धेतही विद्यार्थिनींनी सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच पैगंबर जयंतीनिमित्त विद्यार्थिनींना लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास हसीब शेख, मुख्याध्यापक सय्यद नौशाद अहमद, शेख फरजाना दिलावर, शेख असलम युसुफ पटेल, शेख शाहीन मोहम्मद इसाक, शेख हिना अब्दुल कुद्दुस, शेख सुलताना अब्दुल लतीफ, फरहा बाजी, अमरीन बाजी आदी उपस्थित होते.

# शहरात अवघ्या २ रुपयांत एक लिटर शुद्ध पाणी प्रकल्पाचे अनावरण

### सीएसआरडी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर बसविले पाण्याचे एटीएम



शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या एटीएम मशीन प्रकल्पाचे अनावरण करताना डॉ. सुरेश पठारे. समवेत जागृती ओबेरॉय, अर्चना खंडेलवाल, डॉ. सिमरन वधवा, लता राजोरिया, सारिका मुथा, अर्चना कुलकर्णी यांच्यासह इतर महिला.

नगर – शहरातील सर्वसामान्य नागरिक, कामगार, विद्यार्थी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणाऱ्या दरात शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या सामाजिक बांधिलकीतून सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने नगर–पुणे महामार्गावरील ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र समाजकार्य व संशोधन संस्था (सीएसआरडी) महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचे एटीएम मशीन उभारण्यात आले आहे. अवघ्या २ रुपयांत एक लिटर आर.ओ. शुद्ध पाणी उपलब्ध होणार असल्याने हा उपक्रम नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

या शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या एटीएम मशीन प्रकल्पाचे अनावरण सीएसआरडी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख अर्चना खंडेलवाल, डॉ. सिमरन वधवा, लता राजोरिया, सारिका मुथा, अर्चना कुलकर्णी, रेखा बांब, कीर्ती पारीख, सविता धोखरिया, सीमा राजोरिया, संतोष झालानी, अंजू गुजराती, मंजू झालानी, देवकी कुलवाल, राजश्री रहाणे, अर्चना राजोरिया, नीता बंब, विद्या धोखरिया, न्यायाधार संस्थेच्या अ‍ॅड. निर्मला चौधरी, वैशाली सुरेश पठारे तसेच सीएसआरडी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

सेवाप्रीत सोशल फाउंडेशनने या प्रकल्पासाठी सुमारे एक लाख रुपयांचा खर्च केला आहे. प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सीएसआरडी महाविद्यालयाकडून पाहिली जाणार आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारे ड्रेन पाणी झाडांसाठी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यातून वृक्ष संवर्धनाचा संकल्प देखील साध्य होणार आहे. नाममात्र दरातून मिळणारा निधी हा प्रकल्पाच्या देखभाल खर्चासाठी वापरला जाणार असून, नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यामागे नफा कमावण्याचा कोणताही उद्देश नसल्याचे सेवाप्रीतने स्पष्ट केले. या प्रकल्पासाठी ५०० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बसविण्यात आली असून, एका तासात सुमारे १०० लिटर पाणी उपलब्ध करून देण्याची क्षमता या यंत्रणेची आहे. त्यामुळे महामार्गावरून प्रवास करणारे नागरिक, विद्यार्थी, कामगार आणि परिसरातील नागरिकांनाही याचा लाभ घेता येणार आहे.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, सेवाप्रीतच्या महिला सदस्या सामाजिक क्षेत्रात योगदान देत आहे. शुध्द पाण्याची गरज ओळखून हा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला आहे. दोन रुपयांत एक लिटर शुद्ध पाणी उपलब्ध करून देताना सेवाप्रीतला आर्थिक नफा अपेक्षित नाही. नागरिकांचे आरोग्य आणि त्यांना मिळणारा दिलासा हीच आमच्यासाठी खरी कमाई असल्याचे त्या म्हणाल्या.

अर्चना खंडेलवाल यांनी शुद्ध पाणी हा विषय नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहे. अनेक कामगार आणि विद्यार्थी बाहेरून पाणी विकत घेतात. त्यांच्यासाठी परवडणाऱ्या दरात शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, म्हणून पाण्याचे एटीएम सुरू करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पासाठी मुंबई येथील सीमा गुलाटी यांनी विशेष सहकार्य केले आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सीएसआरडी महाविद्यालयाच्या सभागृहात घरेलू मोलकरीण महिला कामगारांसाठी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात अश्विनी झरेकर यांनी घरेलू मोलकरीण महिलांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. महिलांना केवळ योजनांची माहिती देऊन थांबायचे नाही, तर त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि शासकीय कार्यालयांमधील पाठपुरावा करण्यासाठी सेवाप्रीतच्या सदस्यांनी मदत करण्याचा संकल्प केला.

# गांजेगल्ली येथे शिवमहापुराण कथेला भक्तिमय वातावरणात प्रारंभ



गांजेगल्ली, गंजबाजार येथे आयोजित श्री शिवमहापुराण श्रावण कथा सोहळ्यात कथा निरुपण करताना मंदारबुवा रामदासी समवेत उपस्थित भाविक.

नगर – श्रावण महिन्याच्या पावन पर्वात गांजेगल्ली, गंजबाजार येथे आयोजित करण्यात आलेल्या श्री शिवमहापुराण श्रावण कथा सोहळ्याला भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरुवात झाली. २ ते ६ सप्टेंबरदरम्यान दररोज सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत ही कथा होणार आहे. कथा प्रवक्ते समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी यांच्या रसाळ वाणीतून शिवमहापुराणाचे निरूपण केले जात आहे.

कथेच्या प्रारंभानिमित्त गंजबाजार येथील सोमेश्वर महादेव मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत मोठ्या संख्येने महिला कलशधारी सहभागी झाल्या होत्या. बँड पथक, सजविलेला रथ आणि त्यावर विराजमान असलेले मंदारबुवा रामदासी तसेच सहभागी झालेले शिवभक्त यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. वाजत–गाजत ही शोभायात्रा कथा स्थळापर्यंत पोहोचली.

कथेच्या पहिल्या दिवशी मंदारबुवा रामदासी यांनी शिवमहापुराण श्रवणाचे महत्त्व विशद केले. शिवमहापुराणाचे श्रवण हे पुण्यदायी असून, त्यातून मनुष्याला आध्यात्मिक समाधान आणि सद्मार्गाची प्रेरणा मिळते. श्रावणाच्या पवित्र महिन्यात भगवान शिवाचा महिमा ऐकण्याची संधी मिळणे हे भाविकांचे महत्भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

या धार्मिक उपक्रमाचे कौतुक करताना मंगल भक्त सेवा मंडळाचे प्रमुख राजाभाऊ कोठारी यांनी आयोजक सुमित वर्मा यांच्या कार्याचे अभिनंदन केले. कुटुंबाकडून मिळालेला धार्मिक वारसा पुढे नेण्याचे कार्य सुमित वर्मा मनापासून करीत आहेत. नव्या पिढीला धर्म आणि संस्कृतीचे महत्त्व समजावून सांगण्याची जबाबदारी सर्वांची असून, अशा धार्मिक कथांमधून हे कार्य प्रभावीपणे पुढे जाऊ शकते, असे कोठारी यांनी सांगितले.

कथेची सांगता महाआरतीने झाली. गांजेगल्ली येथे भाविकांसाठी भव्य मंडप उभारण्यात आला असून, दररोज महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रयास ग्रुपच्या अलका मुंदडा यांच्यासह ग्रुपच्या सदस्य तसेच परिसरातील महिला भाविक मोठ्या संख्येने कथाश्रवणासाठी उपस्थित होते.पहिल्या दिवसाच्या महाआरतीचे यजमानपद चेतन कांकरिया, रमेश सानप, सागर गुरव, चंद्रकांत मुक्ता, मंगल भक्त सेवा मंडळाचे पदाधिकारी व सेवेकरी तसेच सहदेव परिवार यांनी भूषविले.

राजेंद्र मालु, ओमप्रकाश मुंदडा, सुरेशजी चांडक, पंकज बाजिया, अभय बोरा, चेतन कांकरिया, प्रशांत मुथ्था, गोपाल वर्मा, आनंद कांकरिया, सागर गुरव, प्रणय दळवी, पवन खंडेलवाल, राहुल सारडा तसेच शिव मित्र प्रतिष्ठानचे संकेत गुरव, अनमोल कांकरिया, आदित्य आनेचा, संकेत रणसिंग, ओम दळवी, यश मुथ्था, गौरव कांकरिया, अमित लड्ढा, सिद्धार्थ कांकरिया, यश सावेकर, प्रसाद भोसले, हर्ष कांकरिया, जतीन सहदेव यांनी विशेष परिश्रम घेतले.

श्रावणाच्या पवित्र महिन्यात भोलेनाथाचा महिमा ऐकण्याची ही भक्तिमय पर्वणी असून, समस्त बंधू–भगिनींनी सहकुटुंब उपस्थित राहून शिवमहापुराण कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सुमित वर्मा यांनी केले आहे.

# पंडित दीनदयाळ स्पर्श योजना प्रभावीपणे राबविण्याची मागणी



वरिष्ठ डाक अधीक्षकांना निवेदन देताना मुकुल गंधे.

नगर – भारतीय डाक विभागामार्फत इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांमध्ये टपाल तिकिटे संग्रहित करण्याचा तसेच त्यांचा अभ्यास व संशोधन करण्याचा छंद निर्माण व्हावा, या उद्देशाने राबविण्यात येणारी पंडित दीनदयाळ स्पर्श योजना अहिल्यानगर जिल्ह्यात व शहरात प्रभावीपणे राबविण्यात यावी, अशी मागणी मुकुल गंधे यांनी केली आहे.

या संदर्भात वरिष्ठ डाक अधीक्षक, मुख्य पोस्ट कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे. पोस्ट ऑफिस अहिल्यानगर आणि पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने ही योजना जिल्हास्तरावर राबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

भारतीय डाक विभागाने शालेय विद्यार्थ्यांमध्ये फिलाटेली म्हणजेच टपाल तिकिटे संग्रहित करण्याचा छंद विकसित करण्यासाठी ३ नोव्हेंबर २०१७ पासून पंडित दीनदयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना टपाल तिकिटांच्या संग्रहाबरोबरच इतिहास, संस्कृती, कला, विज्ञान, समाजजीवन तसेच देशाच्या विविध क्षेत्रांशी संबंधित माहितीचा अभ्यास करण्याची संधी मिळते.

इयत्ता सहावी ते नववीतील शैक्षणिकदृष्ट्या उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आणि टपाल तिकिटे संग्रहित करण्याचा छंद असलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी भारतीय डाक विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या फिलाटेली प्रश्नमंजुषा आणि फिलाटेली प्रकल्प यांच्या आधारे विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात येते.





डॉ. सईद शेख, ॲड.फारुक बिलाल यांचा सत्कार करताना मान्यवर.

# डॉ. सईद शेख, ॲड.फारुक बिलाल यांचा सत्कार

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रिटीच्या अध्यक्षपदी डॉ. सईद शेख तसेच सेंट्रल डव्होकेट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ड. फारुक बिलाल यांची निवड झाल्याबद्दल मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहेमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युनायटेड सिटी हॉस्पिटलचे डॉ. इमरान शेख, न्यू मॉडर्न कन्स्ट्रक्शनचे इंजि. इकबाल सय्यद, वेलनेस सेंटरचे शरफुद्दीन शेख, एन.एम.फाऊंनडेशनचे जाहीद शाह निजाम सय्यद, प्रख्यात शायरा डॉ. कमर सुरुर, संध्याताई मेढे, युनुसभाई तांबटकर, राजुभाई शेख, डॉ. शमा फारुकी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शफकत सय्यद यांनी केले. प्रास्ताविक आबीद दुलेखान यांनी केले, तर आभार डॉ. शमा फारुकी यांनी मानले.

# रक्षाबंधन हा कुटुंब संस्थेला एकत्र बांधणारा धागा

### प्राचार्य संदीप कांबळे

नगर – रक्षाबंधन हे प्रेम, आपुलकी आणि माणुसकीचे दर्शन घडविणारा उत्सव आहे. यामुळे नात्यांमध्ये प्रेम विश्वास आणि आपुलकी निर्माण होते. रक्षाबंधन हा कुटुंब संस्थेला एकत्र बांधणारा धागा असल्याने आज राखी बांधण्याचा सण मतिमंद मुलांच्या निवासी शाळेत साजरा करून निरागस बालकांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि आनंद खऱ्या अर्थाने या आपुलकीच्या स्नेह बंधन सोहळ्यात साजरा करतो हे आमचे भाग्य आहे. असे प्रतिपादन रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे यांनी केले.



वसंत टेकडी येथील डॉ. पाऊलबुधे शैक्षणिक संकुलाच्या वतीने तपोवन रोडवरील मतिमंद मुलांच्या निवासी शाळेत रक्षाबंधन साजरा करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाई चे वाटप करण्यात आले. (छाया– विजय मते)

## डॉ.पाऊलबुधे शैक्षणिक संकुलातर्फे मतिमंद मुलांना शैक्षणिक मदत

तपोवन रोडवरील बाळासाहेब केदार विकास प्रतिष्ठान संचलित मतिमंद मुलांच्या निवासी शाळेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. ना.ज.पाऊलबुधे शैक्षणिक संकुलाच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी.फार्मसी च्या प्राचार्य डॉ. अनुराधा चव्हाण, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सुचित्रा डावरे, बीएड कॉलेजच्या प्राचार्य डॉ.प्राची मचे, डीएड कॉलेजच्या प्राचार्य डॉ.सविता सानप सर्व सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य कांबळे यांनी आपल्या भाषणात बाळासाहेब केदार आणि त्यांच्या संपूर्ण टीमच्या कार्याचा विशेष गौरव केला. ते म्हणाले अत्यंत समर्पित भावनेने या निवासी शाळेची देखभाल आणि या मुलांचे संगोपन व शिक्षणाचे कार्य ही संस्था करत आहे कोणत्याही बाह्य मदतीवर किंवा सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता या मुलांसाठी त्यांनी खऱ्या अर्थाने ही निवासी शाळा उभी केली. प्रेरणादायी आणि माणुसकीचा आदर्श यामधून दिसतो.असे ते म्हणाले.

प्राचार्य डॉ.सविता सानप यांनी आपल्या भाषणात राखीचा धागा जात, धर्म, श्रीमंती– गरिबी या पलीकडे जाणारा आहे. इतिहासात हि राखीने माणुसकीचे बंध जोडले आहेत.त्यामुळे समाजाने एका व्यापक प्रश्नाकडे पाहिले पाहिजे आज आपण प्रत्येक स्त्री च्या सन्मानाची राखी बांधू या प्रत्येक मुलीच्या शिक्षणाची राखी बांधू या तिच्या स्वप्नांच्या स्वातंत्र्याची राखी बांधू या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची राखी बांधू या असा संदेश त्यांनी दिला.

# ‘अहिल्यानगरची अन्नपूर्णा आजी’ म्हणून मीरा आव्हाड यांचा गौरव



‘अहिल्यानगरची अन्नपूर्णा आजी’ म्हणून मीरा आव्हाड यांचा गौरव करताना पीपल्स हेल्पलाईनचे पदाधिकारी.

नगर – शिक्षणासाठी घरापासून दूर येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अल्पदरात पौष्टिक, चवदार आणि घरगुती भोजन उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला मायेचा आधार देणाऱ्या मीरा भगवान आव्हाड यांच्या सेवाभावी कार्याचा पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित करण्यात आलेल्या ‘तिरंगा राष्ट्रीय धारणालय’ कार्यक्रमात त्यांना ‘अहिल्यानगरची अन्नपूर्णा आजी’ या सन्मानाने गौरविण्यात आले.

मीरा आव्हाड आपल्या कुटुंबीयांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी भोजनालय चालवतात. शहरात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना घरगुती आणि सकस अन्न मिळावे, त्यांना परवडणाऱ्या दरात दोन वेळचे जेवण उपलब्ध व्हावे, या भावनेतून त्या गेल्या काही काळापासून ही सेवा करीत आहेत. दररोज सुमारे पाचशे विद्यार्थ्यांच्या ताटात मायेचा घास वाढण्याचे काम त्या करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी त्यांचे भोजनालय केवळ मेस न राहता घरच्या जेवणाची उब देणारे ठिकाण बनले आहे.

यावेळी ॲड. कारभारी गवळी यांनी मीरा आव्हाड यांच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना केवळ भोजन न देता त्यांच्या शिक्षणप्रवासाला शारीरिक बळ आणि मायेचा आधार देणारे मीरा आव्हाड यांचे कार्य हे लोकभक्ती आणि कर्मभक्तीचे जिवंत उदाहरण आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, हनुमंतराव साळवे, आनंदा आढाव, अभिमान शिंदे, चतुराबाई शिंदे, रमेश भोसले आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत यशश्री मगरची चमकदार कामगिरी




नगर – पुणे येथे ऑगस्ट २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत अहिल्यानगरच्या यशश्री सचिन मगर हिने उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम श्रेणी क्रमांक पटकावला. वेग, अचूकता आणि उत्कृष्ट गणिती कौशल्याच्या जोरावर यशश्रीने ही मानाची कामगिरी केली असून, तिच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या स्पर्धेत यशश्री मगर हिने अवघ्या १० मिनिटांत तब्बल १९२ गणिते अचूकपणे सोडवून प्रथम श्रेणी क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी मिळवली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत इतक्या कमी वेळेत मोठ्या संख्येने गणिते अचूक सोडविणे ही तिच्या एकाग्रता, गणिती क्षमता आणि सातत्यपूर्ण सरावाची दखल घेणारी कामगिरी ठरली आहे.

यशश्रीच्या या यशामागे तिच्या कुटुंबीयांचे प्रोत्साहन तसेच गॅलॅक्सी संस्थेचे अमोल ढेपे आणि सोनाली ढेपे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली यशश्रीने नियमित सराव, वेळेचे नियोजन आणि अचूकतेवर विशेष भर देत स्पर्धेची तयारी केली. राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे यशश्रीने अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कौशल्याची विशेष छाप पाडली आहे.

तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालक, शिक्षक, मार्गदर्शक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही ती अशीच यशाची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# आनंद तीर्थ समवशरण येथे ५ सप्टेंबर रोजी ४ गुरूभक्तांच्या मास खमणचे पच्चक्खाणं





नगर – अहिल्यानगर शहरात जैन धर्मियांचा पवित्र समर्पण चातुर्मास २०२६ सुरू आहे. उपाध्याय प्रविणऋषी म.सा. यांच्या या चातुर्मासात भाविक मोठ्या श्रद्धेने जप, तप, आराधना, तपस्या करत आहेत. चातुर्मासानिमित्त ४ गुरूभक्तांनी मास खमण (३१ उपवास) केले असून त्याचे पच्चक्खाण ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता आनंद तीर्थ समवशरण येथे होणार आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

अहिल्यानगर येथील ललित गुगळे, शिल्पा नहार, राहुरी येथील भारती सुराणा आणि खुशी चोरडिया यांनी गुरूदेवांच्या आशीर्वादाने ३१ दिवसांचे कडक उपवास (मास खमण) करून आत्मशुद्धीच्या मार्गावर प्रवास केला आहे. या मास खमणचे पच्चक्खाण (प्रत्याख्यान) शनिवारी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी म.सा., उपाध्याय प्रविणऋषी म.सा., आलोकऋषी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वींच्या सान्निध्यात होणार आहे. यावेळी संगीत भक्ती (भावा) कार्यक्रम होणार असून जैन भक्तीकार वैदेही बोरा आपल्या सुमधुर आवाजात भक्तीगीते सादर करणार आहेत.

जैन धर्मामध्ये मास खमण म्हणजे सलग ३१ दिवस फक्त पाणी पिऊन केलेले कठोर उपवास होय आणि पचकावणी (पच्चक्खाण) म्हणजे या तपाचा विधीपूर्वक घेतलेला संकल्प किंवा नियम होय. आत्मशुद्धीसाठी हे महातप केले जाते. उपाध्याय प्रविणऋषी म.सा. यांच्या समर्पण चातुर्मासात भाविक श्रद्धेने उपवास करून धर्माचरण करत आहेत. आचार्यश्रींच्या जन्मोत्सव सप्ताहात शेकडो भक्तांनी अट्ठाई उपवास केले. याशिवाय मास खमण करणाऱ्या भक्तांची संख्याही वाढत आहे. आचार्यश्रींच्या पावन भूमीत होत असलेला उपाध्यायश्रींचा चातुर्मास अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि सर्वत्र भक्तीचा जागर करणारा ठरत आहे. पवित्र पर्युषण पर्वातही भाविक मोठ्या संख्येने तपस्या करणार आहेत.

या समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. मास खमण करणाऱ्या चार भाविकांचा सौरभ बोरा परिवाराच्या वतीने सोन्याचे नाणे देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

या पच्चक्खाण कार्यक्रमास श्रावक श्राविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्यांनी केले आहे.

# तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने मंगळागौर सोहळा



तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने मंगळागौर सोहळा उत्साहात संपन्न झाला.

नगर – तिळवण तेली समाज ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला मंगळागौर सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. ट्रस्टच्या वतीने मंगळागौर सोहळ्याचे यंदा प्रथमच आयोजन करण्यात आले होते. पहिल्याच वर्षी समाजातील महिला भगिनींनी सहभाग नोंदवत कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिल्याने सोहळ्याला विशेष रंगत आली. पारंपरिक वेशभूषा, विविध खेळ, हास्य–विनोद आणि महिलांचा उत्साह यामुळे संपूर्ण कार्यक्रमस्थळी चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

मंगळागौर हा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा सण मानला जातो. बदलत्या काळातही अशा पारंपरिक उत्सवांचे महत्त्व कायम असून, नव्या पिढीपर्यंत आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची ओळख पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून अशा कार्यक्रमांकडे पाहिले जाते. याच उद्देशाने तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील महिलांना एकत्र येण्यासाठी, संवाद साधण्यासाठी, आनंदाचे क्षण अनुभवण्यासाठी तसेच आपापसांतील स्नेहबंध अधिक दृढ करण्यासाठी या कार्यक्रमाची संकल्पना करण्यात आली होती.

कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी विविध पारंपरिक तसेच मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. फुगड्या, उखाणे, संगीताच्या तालावर आधारित खेळ, विविध गमतीदार स्पर्धा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित राहून कार्यक्रमाचे सौंदर्य अधिक खुलविले. खेळांदरम्यान झालेला हास्य–विनोद, उत्स्फूर्त सहभाग आणि महिलांचा जल्लोष यामुळे कार्यक्रमस्थळी आनंदाची लहर पसरली होती. पहिल्याच वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहता भविष्यातही अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा उत्साह ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाला.

ट्रस्टच्या अध्यक्षा नीता लोखंडे म्हणाल्या, मंगळागौर हा केवळ पारंपरिक खेळ आणि मनोरंजनाचा कार्यक्रम नसून, आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीशी आणि परंपरांशी जोडणारा उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांना एकत्र येऊन काही आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी कमी होत चालली आहे. त्यामुळे तिळवण तेली समाज ट्रस्टच्या माध्यमातून महिलांसाठी मंगळागौर सोहळ्याचे आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमासाठी अध्यक्षा नीता लोखंडे, उपाध्यक्षा शोभाना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर यांनी विशेष पुढाकार घेतला. तसेच विश्वस्त प्रसाद शिंदे, सागर काळे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे आणि मनोज क्षिरसागर यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी परिश्रम घेतले.

# शासकीय वसतिगृह योजनेसह स्वयंम व आधार योजनेसाठी १५ सप्टेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नगर – राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश अर्ज करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या योजनांसाठी १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmasnew.mahait.org या ऑनलाइन संकेतस्थळावर लवकरात लवकर अर्ज भरावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अहिल्यानगरचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## अंतराळस्थानकातील विषाणू अधिक प्रभावी



जीवाणू आणि त्यांना संक्रमित करणारे विषाणू, ज्यांना 'फेजेस' म्हटले जाते, यांच्यात उत्क्रांतीची एक मोठी स्पर्धा सुरू असते. मात्र, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) केलेल्या एका संशोधनातून असे समोर आले आहे की, हा संघर्ष जेव्हा 'मायक्रोग्रॅविटी'मध्ये (सूक्ष्मगुरुत्वाकर्षण) होतो, तेव्हा त्याची दिशा पूर्णपणे बदलते. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात उत्क्रांत झालेले विषाणू हे जीवाणूंना मारण्यासाठी अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे औषधांना दाद न देणाऱ्या जीवाणूंवर हे विषाणू उपयुक्त ठरू शकतात.

'पीएलओस बायोलॉजी' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार, अंतराळातील वातावरणात जीवाणू आणि विषाणूंच्या वागण्यात बदल होतो. पृथ्वीवर जीवाणू स्वतःच्या संरक्षणासाठी नव्या पद्धती विकसित करतात, तर विषाणू त्यावर मात करण्यासाठी स्वतःला बदलतात. अंतराळातील हा संघर्ष समजून घेतल्यास पृथ्वीवरील 'अँटिबायोटिक-रेझिस्टंट' (औषधांना दाद न देणारे) जीवाणूंवर उपचार करण्यासाठी मदत होऊ शकते. युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉन्सिन-मॅडिसनचे सहयोगी प्राध्यापक श्रीवत्सन रमण आणि त्यांच्या टीमने 'ई-कोलाय' जीवाणू आणि 'टी७' फेजेसवर प्रयोग केला. संशोधनासाठी एक गट अंतराळात (आयएसएसवर) तर दुसरा गट पृथ्वीवर वाढवण्यात आला.

अंतराळातील नमुन्यांच्या विश्लेषणातून असे दिसले की, सूक्ष्मगुरुत्वाकर्षणामुळे संसर्गाचा वेग आणि स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. अंतराळात विषाणूंना जीवाणूंवर हल्ला करून त्यांना नष्ट करण्यास पृथ्वीच्या तुलनेत जास्त वेळ लागला. या बदलाचे मुख्य कारण म्हणजे द्रवांचे मिश्रण न होणे. पृथ्वीवर गुरुत्वाकर्षणामुळे गरम पाणी वर येते, थंड पाणी खाली जाते आणि जड कण तळाला बसतात. या सततच्या हालचालीमुळे जीवाणू आणि विषाणू एकमेकांवर आदळतात. मात्र, अंतराळात गुरुत्वाकर्षण नसल्यामुळे सर्व काही तरंगत राहते. 'विषाणू आणि जीवाणू एकमेकांवर वारंवार आदळत नसल्यामुळे, विषाणूंना जगण्याच्या संथ गतीशी जुळवून घ्यावे लागले.

त्यांना जवळून जाणाऱ्या जीवाणूंना पकडण्यासाठी अधिक कार्यक्षम बनावे लागले,' असे प्राध्यापक श्रीवत्सन रमण यांनी स्पष्ट केले. युरोपियन स्पेस एजन्सीच्या माजी खगोलजीवशास्त्रज्ञ निकोल कॅपलिन यांच्या मते, जर आपण हे समजून घेतले की, विषाणू जनुकीय पातळीवर अंतराळातील वातावरणाशी कसे जुळवून घेतात, तर तो अनुभव आपण पृथ्वीवरील औषधांना दाद न देणाऱ्या जीवाणूंविरुद्ध वापरू शकतो. यामुळे 'फेज थेरपी'च्या माध्यमातून अधिक प्रभावी अँटिबायोटिक्स विकसित करणे शक्य होईल.

◆◆◆



## जगातील सर्वात प्राचीन मनोरे

इजिप्तमधील तुतानखामेनचा मकबरा असो किंवा इटलीतील पॉम्पेई शहर, पुरातत्त्व विभागाच्या शोधांनी नेहमीच मानवी इतिहासाला नवी दिशा दिली आहे. मात्र, सध्या गृहयुद्धाने होरपळलेल्या सीरियामध्ये लागलेला 'टेल करामेल' येथील शोध शास्त्रज्ञांसाठी सर्वात मोठा चमत्कार ठरला आहे. हजारो वर्षांपूर्वी येथे एक अत्यंत प्रगत संस्कृती नांदत होती, याचे पुरावे आता समोर आले आहेत.

उत्तर सीरियातील अलेप्पो शहरापासून २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या टेल करामेलमध्ये उत्खननादरम्यान दगडांचे गोलाकार टॉवर्स (मनोरे) सापडले आहेत. रेडिओकार्बन डेटिंगनुसार, हे टॉवर्स इसवी सन पूर्व ११ व्या सहस्राब्दीपासून ते इसवी सन पूर्व ९६५० मधील आहेत. मानवी इतिहासातील ही अशा प्रकारची सर्वात जुनी रचना मानली जात आहे. या शोधामुळे मानवी संस्कृतीच्या सुरुवातीच्या कथेला एक नवीन कलाटणी मिळाली आहे. पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते, हे विशाल टॉवर्स केवळ राहण्यासाठी किंवा देखरेखीसाठी नव्हते. त्यांचा वापर धार्मिक कार्यांसाठी आणि सामूहिक सभांसाठी केला जात असावा.

त्या काळातील लोक येथे एकत्र येऊन विधी आणि अनुष्ठान करत असत. यावरून हे स्पष्ट होते की, इतक्या प्राचीन काळी देखील मानवी समाज संघटित होता आणि त्यांच्या स्वतःच्या सांस्कृतिक परंपरा होत्या. टॉवर्सच्या परिसरात सुमारे ९० घरे आणि लहान खोल्या सापडल्या आहेत, ज्यामुळे ही एक मोठी वस्ती असल्याचे सिद्ध होते. येथे तीन मंदिरांचे अवशेष, अनेक चुली आणि खड्डे सापडले आहेत, जे त्या काळातील रोजच्या जगण्याची साक्ष देतात. चकमक दगड आणि हाडांपासून बनवलेली अवजारे तसेच सजावटीच्या वस्तू मिळाल्या आहेत. या वस्तूंवर भौमितिक आकृत्या, प्राणी आणि मानवांची चित्रे कोरलेली आहेत. शिकारी म्हणून जगणारा समुदाय इतकी प्रगत कला कशी विकसित करू शकला, याचे आश्चर्य शास्त्रज्ञांना वाटत आहे. उत्खननात ३५ मानवी सांगाडे आणि प्राण्यांचे अवशेषही सापडले आहेत. मृतांना घरांच्या खाली किंवा इमारतींच्या दरम्यान खड्ड्यात दफन केले जात असे. विशेष म्हणजे, मृतांना गर्भातील अर्भकाप्रमाणे ठेवले जायचे आणि काही थडग्यांमध्ये दगड किंवा हाडांचे मणी सापडले आहेत. यावरून त्या काळातील लोकांचा 'मृत्यूनंतरच्या जीवनावर' विश्वास होता, असे दिसून येते. टेल करामेलचा हा शोध मानवी सभ्यतेच्या सुरुवातीच्या काळाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलणारा ठरला आहे. ◆◆◆

## सर्वात जुनी 'बार्ड स्पायरल' आकाशगंगा

पुढील पिढीच्या प्रगत उपकरणांमुळे खगोलशास्त्र आणि कॉस्मॉलॉजीच्या सीमा विस्तारत आहेत. अलीकडेच वैज्ञानिकांनी ब्रह्मांडाच्या सुरुवातीच्या काळातील काही आकाशगंगांचा शोध लावला असून, यामुळे आकाशगंगांच्या निर्मिती आणि उत्क्रांतीच्या सिद्धांतांना नवीन दिशा मिळाली आहे. युनिव्हर्सिटी ऑफ पिटस्बर्गच्या नेतृत्वाखालील खगोलशास्त्रज्ञांच्या एका गटाने आतापर्यंतची सर्वात जुनी 'बार्ड स्पायरल' आकाशगंगा शोधून काढली आहे. या शोधामुळे विश्वात ताऱ्यांच्या या विशिष्ट रचनेची निर्मिती नेमकी कधी झाली, याचा कालखंड निश्चित करण्यात मदत होणार आहे. पिटस्बर्ग विद्यापीठातील भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्राचे विद्यार्थी डॅनियल इवानोव्ह यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन करण्यात आले.


नासाच्या जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपच्या साहाय्याने उजडचजड-७४७०६ नावाची ही दीर्घिका शोधण्यात आली. त्यानंतर, केक-१ टेलिस्कोपवरील 'मॉसफायर' उपकरणाद्वारे मिळालेल्या पुष्टीनुसार, ही आकाशगंगा ११.५ अब्ज वर्षांपूर्वी अस्तित्वात असल्याचे सिद्ध झाले आहे. या संशोधनाचे निष्कर्ष ८ जानेवारी २०२६ रोजी फिनिक्स, ॲरिझोना येथे अमेरिकन ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीच्या २४७ व्या बैठकीत सादर करण्यात आले. हबल सिक्वेन्सच्या नियमानुसार, आकाशगंगांचे त्यांच्या आकारानुसार लंबवर्तुळाकार, सर्पिलाकार आणि लेन्टिक्युलर असे गट केले जातात. सामान्यतः आकाशगंगांची सुरुवात अनियमित चकतीसारखी होते आणि कालांतराने त्यांच्या मध्यभागातून बाहेर येणारे सर्पिलाकार हात तयार होतात.

'बार्ड स्पायरल' म्हणजे काय? आपल्या सूर्यमालेची 'मिल्की वे' ही आकाशगंगा देखील एक 'बार्ड स्पायरल' आहे. यामध्ये केंद्रातून ताऱ्यांची एक सरळ रेषेसारखी रचना गेलेली असते. ही रचना बाहेरील वायू केंद्राकडे खेचण्याचे काम करते. यामुळे केंद्रातील 'सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल'ला इंधन मिळते. तसेच, ही प्रक्रिया संपूर्ण आकाशगंगेतील ताऱ्यांच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवते.

◆◆◆



## अंतराळात झेपावले नासाचे 'पँडोरा' टेलिस्कोप



कॅलिफोर्नियातील वँडनबर्ग स्पेस फोर्स बेसवरून नासाच्या 'पँडोरा' या नवीन टेलिस्कोपचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. स्पेसएक्सच्या शक्तिशाली फाल्कन ९ रॉकेटद्वारे हा टेलिस्कोप पृथ्वीच्या कक्षेत सोडण्यात आला. हे टेलिस्कोप विश्वातील 'एक्सोप्लॅनेटस्' (बाह्यग्रह - आपल्या सूर्याव्यतिरिक्त इतर ताऱ्यांभोवती फिरणारे ग्रह) आणि त्यांच्या ताऱ्यांचा अभ्यास करेल.

पँडोरा टेलिस्कोप नासाच्या जगप्रसिद्ध 'जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप'ला पूरक म्हणून काम करणार आहे. ॲरिझोना विद्यापीठातील खगोलशास्त्राचे प्राध्यापक आणि पँडोरा मोहिमेचे सह-संशोधक यांच्या मते, हे टेलिस्कोप अशा अडथळ्यांना दूर करण्यासाठी बनवले आहे जे लहान ग्रहांच्या सखोल अभ्यासात आणि तेथील जीवसृष्टीच्या शोधात मर्यादा आणतात. पृथ्वीवरून पाहताना हे बाह्यग्रह त्यांच्या मूळ ताऱ्याच्या शेजारी अत्यंत फिकट बिंदूंसारखे दिसतात. या ताऱ्यांचा प्रकाश ग्रहांच्या परावर्तित प्रकाशापेक्षा अब्जावधी पटीने जास्त तेजस्वी असतो, ज्यामुळे ग्रहांचे निरीक्षण करणे कठीण होते.

खगोलशास्त्रज्ञ हे ग्रह जेव्हा त्यांच्या ताऱ्यासमोरून जातात, तेव्हा त्यांच्या वातावरणातून फिल्टर होऊन येणाऱ्या प्रकाशाचा अभ्यास करतात. या प्रक्रियेची तुलना मेणबत्तीच्या प्रकाशासमोर लाल वाइनचा ग्लास धरण्याशी केली जाऊ शकते; ज्याप्रमाणे त्यातून वाइनचा दर्जा समजतो, तसेच ताऱ्याच्या प्रकाशावरून ग्रहाच्या वातावरणातील तपशील समजतात. यातून ग्रहाच्या वातावरणात पाण्याची वाफ, हायड्रोजन, ढग आणि जीवसृष्टीचे पुरावे शोधता येतात. २००७ पासून खगोलशास्त्रज्ञांच्या लक्षात आले की, ताऱ्यांवरील 'स्टारस्पॉटस' (ताऱ्यावरील थंड आणि सक्रिय भाग) ग्रहांच्या निरीक्षणात अडथळा निर्माण करतात.

२०१८-१९ मध्ये केलेल्या संशोधनात असे दिसून आले की, ताऱ्यावरील हे गडद डाग आणि चुंबकीयदृष्ट्या सक्रिय तेजस्वी भाग निरीक्षणांमध्ये मोठी दिशाभूल करू शकतात. या समस्येला शास्त्रज्ञांनी 'ट्रान्झिट लाईट सोर्स इफेक्ट' असे नाव दिले आहे. पँडोरा टेलिस्कोप प्रामुख्याने याच तांत्रिक त्रुटी दूर करून लहान परग्रहांचा अचूक डेटा मिळवण्यासाठी काम करेल, ज्यामुळे परग्रहावर जीवन आहे की नाही, हे शोधणे अधिक सुलभ होईल.

◆◆◆

## 'व्हिटॅमिन-यू' ची संजीवनी

आजच्या धावपळीच्या जीवनात आणि प्रदूषित वातावरणामुळे आपली प्रतिकारशक्ती कमकुवत होत चालली आहे. कमी वयातच अनेक आजार आपल्याला घेरतात. अशा परिस्थितीत शरीर सुदृढ ठेवण्यासाठी जीवनसत्त्वे आणि खनिजांनी युक्त आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक जीवनसत्त्वांबद्दल आपण ऐकले असेल, पण तुम्हाला 'व्हिटॅमिन-यू' बद्दल माहीत आहे का? पचनसंस्था आणि पोटाचे आरोग्य राखण्यासाठी हे जीवनसत्त्व अत्यंत प्रभावी ठरते.



व्हिटॅमिन-यू हे कोणतेही औषध किंवा सप्लिमेंट नसून, एक नैसर्गिक घटक आहे. हे प्रामुख्याने कोबी, ब्रोकोली आणि 'क्रुसिफेरस' गटातील भाज्यांमध्ये मुबलक प्रमाणात आढळते. पोटातील अतिरिक्त ॲसिड संतुलित करण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी हे अत्यंत गुणकारी मानले जाते. हे पोटात तयार होणारे अतिरिक्त ॲसिड कमी करते, ज्यामुळे जळजळ आणि ॲसिडिटीची समस्या दूर होते. जंक फूड किंवा तणावामुळे आंतड्यांना होणाऱ्या सूक्ष्म जखमा भरून काढण्याचे आणि आंतड्यांचा आतील थर मजबूत करण्याचे काम हे जीवनसत्त्व करते. हे शरीरातील दाह कमी करते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते.

पोषक तत्त्वांचे शोषण वाढल्यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारते आणि मूडही चांगला राहतो. तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन-यू चा पूर्ण लाभ घेण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे :

**१. कोबी आणि ब्रोकोली :** लंचमध्ये तुम्ही कच्ची कोबी किंवा वाफवलेली ब्रोकोली खाऊ शकता. कोबीवर लिंबाचा रस टाकून खाणे अधिक फायदेशीर ठरते.


**२. जास्त शिजवणे टाळा :** अन्न जास्त शिजवल्यास त्यातील व्हिटॅमिन-यू चे प्रमाण कमी होते. त्यामुळे भाज्या कच्च्या स्वरूपात किंवा हलक्या वाफवून कोशिंबीर म्हणून खाल्ल्यास त्याचा जास्त फायदा होतो.

**३. नैसर्गिक स्त्रोत :** यासाठी कोणत्याही कृत्रिम सप्लिमेंटची गरज नाही, केवळ घरगुती ताज्या भाज्यांतून हे मुबलक प्रमाणात मिळू शकते.

◆◆◆

## कोट्यधिश भिकारी

इंदूरला 'भिकारीमुक्त शहर' बनवण्याच्या मोहिमेदरम्यान प्रशासनासमोर एक असा प्रकार उघडकीस आला आहे, ज्याने अधिकारी आणि नागरिक दोघांनाही आश्चर्याचा धक्का दिला आहे. शहरातील सराफ बाजारात चाकाच्या फळीवर बसून जाणारा दिव्यांग व्यक्ती, ज्याला लोक असहाय्य समजून मदत करायचे, तो प्रत्यक्षात कोट्यवधींच्या मालमत्तेचा मालक निघाला आहे. 'मांगीलाल' नावाच्या या व्यक्तीकडे इंदूरच्या विविध भागांत केवळ तीन घरेच नाहीत, तर त्याच्याकडे एक 'स्विफ्ट डिझायर' ही आलिशान कार आणि तीन रिक्षादेखील आहेत. विशेष म्हणजे, आपली कार चालवण्यासाठी त्याने एक खासगी ड्रायव्हरही ठेवला आहे.



महिला व बालविकास विभागाच्या पुनर्वसन पथकाने जेव्हा मांगीलालला ताब्यात घेतले आणि त्याला पुनर्वसन केंद्रात नेण्याची तयारी दर्शवली, तेव्हा तो घाबरला. कारवाईच्या भीतीने त्याने स्वतःच्या संपत्तीचा पाढा वाचायला सुरुवात केली. मांगीलालने नोडल अधिकाऱ्यांसमोर कबूल केले की : त्याचा भगतसिंग नगरमध्ये एक तीन मजली बंगला आहे. शिवनगरमध्ये ६०० स्क्वेअर फूटचे घर आणि अलवासा भागात एक फ्लॅट आहे. त्याच्या तीन रिक्षा शहरात भाड्याने चालतात, ज्यातून त्याला नियमित उत्पन्न मिळते. दिव्यांगत्वाचा फायदा घेऊन त्याने 'प्रधानमंत्री आवास योजने'अंतर्गतही एक घर लाटले आहे. मांगीलाल कधीही लोकांकडे उघडपणे पैसे मागत नसे. तो आपल्या हातांत बूट घालून आणि पाठीवर बॅग लटकवून जमिनीवर चाकाच्या फळीवरून जात असे. त्याची ही दयनीय अवस्था पाहून येणारे-जाणारे लोक स्वतःहून त्याला पैसे द्यायचे. यातून तो दिवसाला सरासरी ५०० ते १,००० रुपये कमवत असे.

तपासामध्ये आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मांगीलाल केवळ भीक मागण्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो एका सराईत सावकाराप्रमाणे काम करायचा. भीक मागून जमा झालेली मोठी रक्कम तो सराफ बाजारातील छोट्या व्यापाऱ्यांना आणि दुकानदारांना जादा दराने व्याजाने द्यायचा.

दर आठवड्याला तो या दुकानदारांकडून व्याजाची वसुली करण्यासाठी जात असे. नोडल अधिकारी दिनेश मिश्रा आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी रजनीश सिन्हा यांनी सांगितले की, मांगीलालच्या मालमत्तेची आणि बँक खात्यांची सखोल चौकशी सुरू आहे. श्रीमंत असूनही सरकारी योजनांचा गैरफायदा घेणे आणि बेकायदेशीर सावकारी करणे हा गंभीर गुन्हा आहे. त्याला जिल्हाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाणार असून, फसवणुकीच्या कलमांखाली त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल.

◆◆◆

## अख्खे शहर बर्फाच्छादित

सहसा 'हिमवादळ' हा शब्द ऐकल्यावर किंवा वाचल्यानंतर यामध्ये वादळाचा असणारा उल्लेख पाहता त्याची तीव्रता लक्षात येते. मात्र, प्रत्यक्षात हे हिमवादळ कोणत्या स्वरूपातील असतं आणि ते धडकल्यास नेमकी काय स्थिती उद्भवते याची प्रचिती नुकतीच संपूर्ण जगाला आली आहे. रशियात हिमवादळामुळे अख्खंच्या अख्खं शहरच बर्फाखाली दबल्याचं पाहायला मिळालं.

रशियाच्या अतिपूर्वेला असणाऱ्या कामचटका पेनिन्स्युला इथे १७ जानेवारी रोजी हे अतिप्रचंड हिमवादळ धडकले, ज्यातून हे शहर अद्यापही सावरू शकलेले नाही. तज्ज्ञांच्या माहितीनुसार मागील ६० वर्षांमधील ही सर्वाधिक हिमवृष्टी असून, शहरातील बहुतांश भागांमध्ये सोळा फूट बर्फाचे थरच्या थर जमल्याचे पाहायला मिळाले. ज्यामुळे काही इमारतींचे बाहेर येण्याचे मार्ग बंद झाल्याने नागरिक आहेत तिथेच अडकले. घराबाहेर पडण्यासाठी अनेक नागरिकांना खोदकाम करत जमलेल्या बर्फाच्या ढिगाऱ्यातून वाट काढावी लागली.

अनेकांची वाहने या ढिगाऱ्याखाली अडकली. निसर्गाने हे रौद्ररूप धारण केलेले असतानाच वादळ शांत झाल्यानंतर बर्फाच्या या ढिगाऱ्याकडे एक संकट म्हणून न पाहता नागरिकांनी यातूनही एक वाट काढली. कामचटका इथे डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या हिमवर्षावाच्या तुलनेत तिप्पट अधिक हिमवर्षाव जानेवारीत झाल्यामुळे हिमवादळाची कधीही न पाहिलेली भीषणता नागरिकांनी अनुभवली. काहींनी या बर्फाच्या ढिगाऱ्यावर चक्क घसरगुंडीचाही आनंद घेतला. शहरातील अनेक रस्ते बर्फामुळे बंद असताना आणि बाजारहाट किंवा तत्सम गोष्टींसाठी कोणताही वाव नसताना नागरिकांनी आपलाच विरंगुळा म्हणून या बर्फाच्छादित भागातही आनंदाच्या वेगळ्या वाटा निवडल्या आहेत.

प्राथमिक माहितीनुसार ७० च्या दशकानंतर झालेली ही सर्वात मोठी



हिमवृष्टी असून, यामध्ये काही दुर्घटनांची नोंदही करण्यात आली आहे. जिथे दोन नागरिकांचा मृत्यू छतावरील बर्फ पडून झाला आहे. ही परिस्थिती भीषण असून, प्रशासनाने आणीबाणीसुद्धा घोषित केली आहे. कामचटका आणि नजीकच्या भागातील शाळा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, हवाई प्रवास ठप्प झाला असून, यातून सावरण्यासाठी आणखी काही दिवस जाणार असल्याचे स्पष्ट होत आहे. कामचटका हे ठिकाण पॅसिफिक महासागर आणि ओखोत्साक समुद्रादरम्यान असून, येथील भौगोलिक स्थिती आणि हवामानाची एकंदर स्थिती पाहता हिमवृष्टीसाठी इथे अतिशय पूरक वातावरण आहे. इथे येणाऱ्या चक्रीवादळामुळे हवामानातील दमटपणा वाढतो आणि थंड वाऱ्यांशी एकरूप होऊन इथे हिमवर्षाव होतो. कामचटका येथील पर्वत आणि ज्वालामुखी यामुळे दमट हवा पर्वतांशी आदळून उंचावर जाते आणि थंड वाऱ्यामुळे या दमटपणाचे बर्फात रुपांतर होते.

◆◆◆

# सरस्वती हॉस्पिटलच्या नूतनीकृत व विस्तारित सुपर स्पेशालिटी सुविधांचे ६ सप्टेंबरला लोकार्पण

## अत्याधुनिक सर्जरी तंत्रज्ञानासह आपुलकीच्या आरोग्य सेवेचा विस्तार


डॉ. अमोल जाधव


डॉ. प्राजक्ता जाधव



नगर – इवलासा जीव जन्माला येतो आणि त्याच्या स्वागताचे आणि पहिल्या स्पर्शाचे भाग्य आम्हाला लाभते अशा हृदयस्पर्शी भावनेने हजारो स्वप्नांना जन्म देणारे सरस्वती हॉस्पिटल आता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल झाले आहे. दशकपूर्तीकडे वाटचाल करताना आरोग्य सेवेचे नवीन पर्व सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या रूपाने सुरू होत आहे. ६० बेड पर्यंत विस्तार आणि अत्याधुनिक सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया सुविधा असलेल्या नूतनीकृत व विस्तारित हॉस्पिटलचे लोकार्पण ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे, अशी माहिती सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.अमोल जाधव व डॉ.प्राजक्ता जाधव यांनी दिली.

लोकार्पण सोहळा श्री विशाल गणपती मंदिराचे पुजारी पूज्य संगमनाथ महाराज यांच्या हस्ते आणि पूज्य साध्वी नर्मदाजी माता यांच्या आशीर्वादाने होईल. माळीवाडा परिसरातील सरस्वती हॉस्पिटलने दशकपूर्तीकडे वाटचाल करताना सुपर स्पेशालिटी आरोग्य सेवा विस्तार केला आहे. डॉ. जाधव यांनी सरस्वती हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवताना वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञानाचा रूग्णांना लाभ देत जास्तीत जास्त चांगली सेवा देण्याचे ठरवले होते. या सेवेला रूग्णांच्या विश्वासाची पोचपावती मिळाली आहे. याठिकाणी आता सुपर डव्हान्स लॅप्रोस्कोपी सुविधा उपलब्ध झाली आहे. गायनेकोलॉजी, जनरल सर्जरी, युरोलॉजी या सर्व विभागांसाठी एकत्रितपणे वापरता येणारी अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी सिस्टम उपलब्ध करण्यात आली आहे. ४ के/ एचडी व्हिज्युलायझेशन सिस्टीममुळे अत्यंत स्पष्ट आणि झूम डिटेल्स दिसत असल्याने शस्त्रक्रिये दरम्यान अधिक अचूकता मिळण्यास मदत होते. छोट्या चिरांद्वारे ऑपरेशन होऊन कमी वेदना, कमी रक्तस्राव आणि जलद रिकव्हरी होते.सुरक्षित टिश्यू कटिंग आणि ब्लीडिंग कंट्रोलसाठी आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. यामुळे विविध रोगांवरील शस्त्रक्रिया, हर्निया, गॉलब्लॅडर, अपेंडिक्स, किडनी, प्रोस्टेट, संबंधित शस्त्रक्रिया अधिक अचूक होण्यास मदत होते. कॉर्पोरेट हॉस्पिटल लेव्हलचे हाय–कॉस्ट, हाय–परफॉर्मन्स मशीन कार्यान्वित झाले आहेत.

मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर, सुसज्ञ प्रसूती व स्त्री रोग विभाग, डव्हान्स लेबर आणि डिलिव्हरी कक्ष, हाय रिस्क प्रेगनन्सी आणि डिलिव्हरी युनिट, ३ डी/४डी सोनोग्राफी, अधिकृत एमटीपी व कुटुंब नियोजन केंद्र, प्रसूती आयसीयू, शस्त्रक्रिया विभाग, १० बेडचा आयसीयु, जनरल सर्जरी, कॅन्सर विभाग, कान, नाक, घसा सर्जरी, ऑर्थो पेडिक सर्जरी, तोंडाच्या सर्जरी, एनोरेक्टल सर्जरी अशा अत्याधुनिक सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मॉड्युलर ऑपरेशन थिएटर मुळे अधिक सुरक्षित, इन्फेक्शन कंट्रोल आणि उच्च दर्जाची शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाली आहे. आई व बाळाला सुरक्षित संसर्ग विरहित वातावरण मिळण्यासाठी खास डिझाईन केलेले सुसज्ञ डिलिव्हरी रूम साकारण्यात आले आहे. याशिवाय

प्रसूती अधिक सुलभ, सुरक्षित आणि कम्फर्टेबल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. सर्व रिपोर्ट ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतात. ओपीडी मध्ये रूग्णांना जास्त वेळ वेटिंगला थांबण्याची आवश्यकता नसणार आहे. हॉस्पिटलच्या या विस्तारामुळे परिसरातील रुग्णांना आता मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही. सर्व अत्याधुनिक सुविधा आता आपल्या शहरातच उपलब्ध झाल्या आहेत. तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम याठिकाणी आरोग्य सेवा देणार आहे. विश्वसनीय आणि आपुलकीच्या रूग्ण सेवेची परंपरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून अखंडित चालू राहणार आहे. तरी या लोकार्पण सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव, बाबासाहेब जाधव, मिनाताई सत्रे, सुरेश जाधव, संजय जाधव, मनपाच्या स्थायी समितीच्या माजी सभापती सुवर्णा जाधव व जाधव परिवार तसेच नंदनवन उद्योग समूह, सरस्वती हॉस्पिटल टीमने केले आहे.

# अहिल्यानगर जिल्हा कारागृहात ध्वज दिन उत्साहात साजरा

नगर – कारागृह विभागाच्या सुधारणा व पुनर्वसन या ब्रीद वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने अहिल्यानगर जिल्हा कारागृह प्रशासनामार्फत बंद्यांसाठी वेळोवेळी विविध सण, उत्सव, सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक व मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्यानुसार १ सप्टेंबर रोजी कारागृह विभागाचे ध्वज दिनाचे औचित्य साधुन अहिल्यानगर जिल्हा कारागृह व आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हा कारागृहातील बंद्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी, बंद्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत व्हावी आणि त्यांचे मनपरिवर्तन व्हावे, याकरीता देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी कारागृहातील बंद्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत्त होणेसाठी, तसेच बंद्यांच्या मनामध्ये देशभक्ती जागृत होण्यासाठी व मानसिक स्वास्थ्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमास आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगरचे सुभाष गड्डम हे देखील उपस्थित होते. गायक व गिटार वादक गिरीराज जाधव, पियानोवादक नरेंद्र साळवे तसेच तबला वादक सार्थक डावरे यांनी हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यावेळी देशभक्तीपर गीत तसेच भक्तीगीतांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमात बंद्यांनी सहभाग नोंदवत प्रतिसाद दिला.



# गुरुवाणी – ४०

## मनात श्रीकृष्ण तत्वाचा जन्म व्हावा

आज श्रीकृष्ण जन्माष्टमी आहे. श्री आणि कृष्ण दोन शब्द आहेत. कृष्ण म्हणजे काळा, निगेटिव्ह. तर श्री म्हणजे ऐश्वर्य. जो निगेटिव्हला सुद्धा आपले ऐश्वर्य बनवतो तो म्हणजे 'श्रीकृष्ण'. ज्याला कारागृहात जन्माला यावं लागलं. त्याचा मामा त्याच्या जीवावर उठला होता पण तरीही श्रीकृष्णाला तो काही करू शकला नाही. सुदर्शन चक्र असूनही त्याने शिशुपालाचे ९९ अपराध हसतमुखाने पोटात घेतले. समृद्धीच्या शिखरावर पोहोचला तरी त्याने सुदामाचे पोहे प्रेमाने खाल्ले तो आहे श्रीकृष्ण. त्याने महाभारतात शस्त्र हाती नाही घेतलं तरी पांडवांना त्याची साथ मोलाची वाटली. पर्युषण पर्व हे सुद्धा समर्पण, मानवतेचे पर्व आहे. ते निवडायचे की आक्रमणाचे पर्व निवडायचं हे तुमच्या हातात आहे. संवत्सरीला शाश्वत नवीन वर्ष आहे. तो कॅलेंडरचा नाही, मानवतेच्या जन्माचा उत्सव आहे. अर्जुनाला कधी सेनेचे मूल्य नव्हतं, त्याच्यासाठी श्रीकृष्णच सर्व काही होते. तुमच्यासाठी पर्युषण पर्व सर्व काही असले पाहिजे. कारण हा सण शत्रूलाही मित्र बनवणारा आहे. अरिष्टनेमी प्रभू घोषणा करतात द्वारकेचा विनाश होणार. तेव्हा श्रीकृष्ण द्वारकेचा विनाश होण्याचे कारण ठरणारी दारू नष्ट करतो. विनाश आपल्यामुळे होऊ नये यासाठी ऋषी सुद्धा सुंदर द्वारका सोडून जंगलात जातात. पण नशेत धुंद असलेल्यांना कधी संतांची साधना दिसत नाही. यादव वंशी कुमार दारूच्या नशेत ऋषींना उचकवतात. परिणामी ऋषी संकल्प करतात, 'आता मी या द्वारकेचा विनाश करणारच'. तेव्हा श्रीकृष्ण स्वतः जाऊन ऋषींची क्षमा मागतात. नशाखोरांच्या चुकीची शिक्षा संपूर्ण द्वारकेला देऊ नका अशी विनंती करतो. पण ऋषींचा संताप अनावर झाला होता. तरीही श्रीकृष्ण हार मानत नाही. त्यांनी अरिष्टनेमींना द्वारका वाचवण्याचा उपाय विचारला. ज्यांनी भविष्यवाणी केली त्यांच्याकडेच श्रीकृष्णाने उपाय विचारला. ही असते श्रद्धा. अरिष्टनेमी सांगतात, द्वारकेत आयंबिल व्रत सुरू करा. जोपर्यंत आयंबिल चालेल तोपर्यंत द्वारका सुरक्षित राहील. हे असते विघ्न विनाशक तप. श्रीकृष्णाने द्वारकेत आयंबिलची घोषणा केली. पण ते स्वतः आयंबिल करू शकत नव्हते. ते करू शकत नव्हते पण इतरांना तप करण्याची प्रेरणा देण्याची ताकद त्यांच्यात होती. आज जन्माष्टमीला आपल्या मनात श्रीकृष्ण तत्वाचा जन्म व्हावा.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# महंत योगी गेंडानाथ महाराज यांच्या स्मृतीदिनी ५ सप्टेंबर रोजी महाप्रसाद



नगर – अहिल्यानगरचे ग्रामदैवत विशाल गणेश मंदिराचे पुजारी महंत योगी गेंडानाथ महाराज यांच्या २८ व्या पुण्यस्मृतीनिमित्ताने श्री विशाल गणेश सेवा मंडळाच्यावतीने ५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन सप्तपदी मंगल कार्यालय येथे करण्यात आले आहे. तसेच समाधीस्थळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये सकाळी ७ वाजता समाधी पूजन, दुपारी १२ वाजता साधू, संत, महंत यांच्या पावन उपस्थितीत पुष्पवृष्टी, त्यानंतर साधू, संतांची पंगत असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तरी भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांनी केले आहे.

# सर्वांनी डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करावा; विश्व हिंदू परिषदेचे गणेश मंडळांना आवाहन

नगर – यंदाचा गणेशोत्सव डीजे मुक्त, पारंपारिक पद्धतीने आणि भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि मंगलमय सण आहे. या उत्सवाचे पावित्र्य जपण्यासाठी डीजेसारख्या कर्णकर्कश आणि हानिकारक ध्वनिप्रदूषणाला फाटा देणे गरजेचे आहे. त्याऐवजी ढोल, ताशा, सनई, चौघडा, तुतारी अशा आपल्या पारंपारिक वाद्यांच्या मंगलमय गजरात श्री गणेशाची स्थापना आणि विसर्जन मिरवणूक काढावी, जेणेकरून उत्सवाची खरी सांस्कृतिक ओळख जपली जाईल. डीजेच्या अतितीव्र आवाजामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक, गरोदर महिला, आजारी व्यक्ती व हृदयरुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अनेकांना हृदयविकाराचा आणि बहिरेपणाचा धोका निर्माण होतो. हा आवाज आपल्या धार्मिक भावनेला आणि भारतीय संस्कृतीला बाधा आणणारा आहे. गणेशोत्सव ही केवळ मिरवणूक नसून ती आपली संस्कृती आहे. या काळात अनेक गणेश मंडळे रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, ऐतिहासिक व पौराणिक देखाव्यांतून समाजप्रबोधन असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात. या सामाजिक कार्याला डीजे मुक्त उत्सवामुळे अधिक शोभा येईल.

त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी, कार्यकर्त्यांनी आणि भाविकांनी एकत्र येऊन डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करून संपूर्ण राज्यासमोर एक आदर्श निर्माण करावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री अनिल जोशी यांनी केले आहे.

# एफडीएच्या जाचक अटींमुळे केटरिंग व्यावसायिक मेटाकुटीला

नगर – मंगल कार्यालय चालक मालक तसेच अहिल्यानगरमधील केटरिंग व्यावसायिक आणि एफडीए (अन्न व औषध प्रशासन) यांच्यात ३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत केटरिंग व्यावसायिकांवर लादण्यात आलेल्या नव्या जाचक अटींमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील लहान – मोठे सर्व केटरिंग व्यावसायिक प्रचंड अडचणीत सापडले आहेत. या अटींमध्ये तातडीने बदल करून व्यावसायिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी अहिल्यानगरचे प्रसिद्ध व्यावसायिक, नंदराज केटरर्सचे सर्वेसर्वा राजेंद्र उदागे यांनी केली आहे.

केटरिंग व्यवसायावर आज हजारो कुटुंबांचा रोजगार अवलंबून आहे. अहिल्यानगर सारख्या ठिकाणी लग्नसराई, धार्मिक कार्यक्रम, छोटे– मोठे समारंभ हे पूर्णपणे आमच्यावर अवलंबून असतात. अशा वेळी अचानक परवाना, स्वच्छता प्रमाणपत्र, आणि फूड लॅब टेस्टिंगसाठी अवास्तव फी आणि किचकट कागदपत्रांची मागणी करणे हे ग्रामीण आणि छोट्या शहरातील व्यावसायिकांसाठी अशक्य आहे, असे उदागे म्हणाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील व्यावसायिकांसाठी दरवर्षीचे नूतनीकरण आणि ऑनलाईन प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी कमी कराव्यात, छोट्या केटरर्सना मोठ्या हॉटेल्सप्रमाणे फी लावणे अन्यायकारक आहे. उलाढालीनुसार फी आकारणी करावी, कारवाई करण्यापेक्षा एफडीएने अहिल्यानगरमध्ये आम्हाला स्वच्छता आणि अन्न सुरक्षा याबाबत मोफत प्रशिक्षण शिबिरे द्यावीत, अशा मागण्या केटरिंग व्यावसायिकांनी केल्या आहेत.

आम्ही अन्न सुरक्षेच्या विरोधात नाही. ग्राहकाला शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळावे हेच आमचेही ध्येय आहे. पण नियम हे व्यवहार्य असावेत, जाचक नसावेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व केटरिंग बांधवांनी एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी लढण्याची हीच वेळ आहे, असे आवाहनही उदागे यांनी केले.


या विषयावर लवकरच अहिल्यानगर येथे सर्व केटरिंग व्यावसायिकांची एकत्रित बैठक घेऊन पुढील भूमिका ठरवली जाणार आहे.

# अमेरिकेतून अहिल्यानगरच्या देशपांडे हॉस्पिटलमध्ये आलेल्या ३३ वर्षीय महिलेच्या पोटातून काढली तब्बल चार किलोंची गाठ

नगर – अमेरिकेत ओपन सर्जरीचा सल्ला मिळालेल्या एका ३३ वर्षीय परदेशी नागरिकावर अहिल्यानगरच्या देशपांडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल येथील डॉक्टरांनी लॅप्रोस्कोपिक पद्धतीने अत्यंत आव्हानात्मक शस्त्रक्रिया पार पाडली. तब्बल ४ किलो वजनाची गर्भाशयातील फायब्रॉइडची गाठ यशस्वीरीत्या काढून डॉक्टरांनी या तरुण महिलेचे गर्भाशय सुरक्षित ठेवले असून, ती आता पूर्णपणे बरी होऊन अमेरिकेत परतली आहे.

ही महिला उपचारासाठी अमेरिकेतून थेट भारतात आली होती. तिच्या गर्भाशयातील गाठीचा आकार इतका प्रचंड वाढला होता की, तिचे पोट जवळपास नऊ महिन्यांच्या गर्भावस्थेएवढे दिसत होते. अमेरिकेतील डॉक्टरांनी एवढ्या मोठ्या गाठीसाठी केवळ ओपन सर्जरीचा पर्याय सुचवला होता आणि लॅप्रोस्कोपी अशक्य असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, देशपांडे हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी सविस्तर तपासणीनंतर ओपन सर्जरीचा धोका टाळून लॅप्रोस्कोपिक पद्धतीनेच ही कठीण शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

मोठ्या गाठीसाठी ओपन सर्जरी करताना पोटावर मोठा छेद द्यावा लागतो. त्यामुळे तीव्र वेदना, रुग्णाला जास्त काळ सक्तीची विश्रांती, पोटावर मोठे व्रण राहणे यासह अ‍ॅझेशन्स, स्कार–साईट हर्निया आणि अतिरक्तस्रावाचा मोठा धोका असतो. याउलट, लॅप्रोस्कोपीमध्ये लहान छेदांद्वारे उपचार झाल्यामुळे वेदना कमी होतात, रुग्णाची हालचाल लवकर सुरू होते आणि दैनंदिन जीवनही विनासायास पूर्वपदावर येते.


अमेरिकेतून आलेल्या महिलेवर शस्त्रक्रिया करुणारी देशपांडे हॉस्पिटल तज्ज्ञ डॉक्टरांची टीम.

गाठीचा अवाढव्य आकार पाहता ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती. गाठ सुरक्षितपणे वेगळी करणे, रक्तस्रावावर पूर्ण नियंत्रण ठेवणे आणि गाठ बाहेर काढल्यानंतर गर्भाशयाची अचूक पुनर्बांधणी करणे आवश्यक होते. ही यशस्वी शस्त्रक्रिया डॉ. प्रीती देशपांडे, डॉ. स्वारिका देशपांडे आणि डॉ. अंगद रणदिवे यांच्यासह अनुभवी भूलतज्ज्ञ डॉ. शिरीष कुलकर्णी आणि ऑपरेशन थिएटरच्या संपूर्ण सहकारी टीमने पार पाडली.

तरुण वयाची महिला असल्याने तिचे गर्भाशय सुरक्षित ठेवणे अत्यंत गरजेचे होते. हिस्टेरेक्टॉमी (गर्भाशय काढणे) करण्याऐवजी मायोमेक्टॉमी (केवळ गाठ काढणे) करून गर्भाशयाची पुनर्बांधणी करण्यात आली, ज्यामुळे भविष्यात गर्भधारणा होण्याची शक्यता पूर्णपणे जपता आली आहे. परदेशात अनेकदा वैद्यकीय उपचारांसाठी मोठा खर्च आणि महिनोन्महिने प्रतीक्षा करावी लागते. या पार्श्वभूमीवर, अहिल्यानगरसारख्या शहरात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि भारतीय डॉक्टरांच्या उच्च कौशल्यामुळे ही जटिल शस्त्रक्रिया यशस्वी होणे, हे देशाच्या आरोग्य क्षेत्रातील प्रगतशील आणि दर्जेदार क्षमतेचे मोठे उदाहरण ठरले आहे. देशपांडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमसाठी ही अभिमानाची आणि गौरवाची बाब ठरली आहे.

# डॉल्बीचा आणि लेझर बीमचा वापर टाळून पर्यावरण स्नेही गणेश उत्सव करण्याचे महाअंनिसचे आवाहन

नगर – डॉल्बीचा आणि लेझर बीमचा वापर टाळून पर्यावरण देशातील सर्वच सण– उत्सव हे पर्यावरण स्नेही करण्याचे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेने केले आहे.

जिल्हा शाखेच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पर्यावरण स्नेही उत्सवासाठी सुरुवातीपासून व्यापक प्रबोधन व कृती कार्यक्रम राबवलेले आहेत. त्यामध्ये विसर्जित गणपती दान करा, निर्माल्य गोळा करा, फटाके मुक्त दिवाळी, फटाके मुक्त नवीन वर्ष, होळीची पोळी गरजूला द्या, होळी लहान करा, बकरी ईद निमित्त रक्तदान शिबिर, पर्यावरण स्नेही रंगपंचमी असे विविध उपक्रम समाजात राबवण्याचे काम महाअंनिसने केले आहे. समितीने सुरू केलेले हे उपक्रम समाज व शासनमान्य झालेले आहेत. सर्व जाती धर्मातील सण–उत्सव हे पर्यावरणपूरक व्हावेत ही अंनिसची भूमिका राहिलेले आहे.

मानवी जीवनाला तसेच पशु–पक्ष्यांना घातक ठरणाऱ्या डॉल्बीचा दणदणाट गेल्या काही वर्षात वाढत आहे. राज्यातून हद्दपार झालेली डॉल्बी गेल्या काही दिवसात पुन्हा जोमाने डॉल्बीचा आवाज घुमू लागला आहे. राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याने डॉल्बीचा आवाज वाढत आहे. डॉल्बी मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या पर्यावरण पूरक कार्यक्रमाच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. येणाऱ्या गणेश उत्सवात या डॉल्बीचा आणि लेझर बीमचा वापर टाळून पर्यावरण स्नेही गणेश उत्सव करण्याचा अहवाल संघटनेच्या वतीने करण्यात आलेले आहे. या बाबत आम्ही राज्यभर प्रबोधन करीत आहोत. धार्मिक सणातील श्रद्धेशी या डॉल्बीचा काहीही संबंध नाही. श्रद्धेचा संबंध भक्तिशी असतो आणि डॉल्बीचा संबंध उन्मादाशी आहे. सर्वांनाच त्रासदायक ठरणाऱ्या डॉल्बीला समाजातून हद्दपार करण्याचा निर्धार करूया, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कॉ. बाबा आरगडे, राज्य सचिव अ‍ॅड. रंजना गवांदे, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, उपाध्यक्ष प्रमोद भारूळे, डॉ. प्रकाश गरूड, कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, प्रधान सचिव विनायक सापा, सोशल मिडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, महिला सहभाग कार्यवाह छाया बंगाळ, कायदा सल्लागार अ‍ॅड. अभय राजे, शशिकांत गायकवाड, कारभारी गायकवाड, प्रा. अशोक गवांदे, बी. के. चव्हाण, दिपक शिरसाठ, मल्हारी खेडकर आदींनी केले आहे.

# हिंदू धर्मातील सर्वोच्च आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास यात्रेचे आयोजन

नगर – हिंदू धर्मातील सर्वोच्च आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली. सदर यात्रा २६ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरपर्यंत आहे.

आदी कैलास हे भगवान शंकराचे निवासस्थान आहे. त्याला फार धार्मिक महत्व आहे. ही यात्रा फार पुरातन आहे. पांडवांनीसुद्धा पापक्षालनासाठी ही यात्रा केली होती. आदी कैलास समुद्र सपाटीपासून १८००० फूट उंचीवर आहे. आता भारत सरकारने या परिसरात संपूर्ण रस्त्यांचे जाळे उभारले आहे. त्यामुळे ही यात्रा पूर्ण वाहनाने होते. कुठेही चालावे लागत नाही. भारतातील भगवान शंकरांची पहिलीच तीर्थ यात्रा आहे, जिथे चालावे लागत नाही. त्याचबरोबर या यात्रेत मोठा कैलासाच्या दर्शनाची सोय केली आहे. मोठा कैलास तिबेटमध्ये असल्याने चीन सरकारने या यात्रेवर बंधने आणल्यामुळे आता भारतातूनच एक व्ह्यू पॉईंट केल्याने मोठ्या कैलासाचे सुद्धा लांबून पण भारतातून दर्शन या यात्रेत होणार आहे.

कुठलाही पासपोर्ट विजा लागणार नाही. त्याच बरोबर ॐ आकारच्या पर्वताचे या यात्रेत दर्शन होणार आहे. या यात्रेत जगप्रसिद्ध नीम करोली बाबा, गोलू देवमंदिर, पाताळ भुवनेश्वर, जागेश्वर धाम, महर्षी व्यास गुफा, मुळ काली माता या मंदिराचे सुद्धा दर्शन होणार आहे. पूर्ण यात्रा अहिल्यानगर ते अहिल्यानगर आहे. ज्यांना या यात्रेला सहभागी व्हायचे असेल, त्यांनी अभिजीत पोळ (९४२२२२७९०६) आणि नंदकुमार पोळ (७८७५५०००५६) किंवा पुष्पम टूर्स अ‍ॅण्ड ट्रॅव्हल्सशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारत–अमेरिका व्यापार करार शेतकरीविरोधी

## राजन क्षीरसागर यांचे प्रतिपादन; किसान सभेच्या कार्यशाळेत शेतकरी प्रश्नांवर चर्चा

नगर – भारत–अमेरिका व्यापार करार भारतीय शेतकरीविरोधी असून, केंद्र सरकारकडून शेतकरीविरोधी आणि कार्पोरेटधार्जिणी धोरणे राबविली जात आहेत. या धोरणांना किसान सभेचा तीव्र विरोध असून, देशातील शेतकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून शेतीविषयक धोरणे आखली पाहिजेत. सर्वांना अन्नधान्य, फळे, भाजीपाला, दूध, अंडी आणि मांस पुरविणाऱ्या शेतकऱ्याला जगविण्याची धोरणे केंद्र शासनाकडून अपेक्षित आहेत, असे प्रतिपादन किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. राजन क्षीरसागर यांनी केले.


महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने बुरुडगाव रोड येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने बुरुडगाव रोड येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शेती क्षेत्रासमोरील आव्हाने व आपले उत्तरदायित्व या विषयावर मार्गदर्शन करताना कॉ. क्षीरसागर बोलत होते. यावेळी किसान सभेचे राज्य सेक्रेटरी कॉ. अशोक सोनारकर, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. अ‍ॅड. सुभाष लांडे, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष बबनराव सालके, सेक्रेटरी कॉ. आप्पासाहेब वाबळे, कॉ. अ‍ॅड. सुधीर टोकेकर, बापूराव राशिनकर, लक्ष्मण नवले, संदीप इथापे, श्रीधर अधिक, रवींद्र वाबळे, बाबासाहेब सोनपुरे, भारत आरगडे, प्रकाश थोरात, राजेंद्र व्यवहारे, बबनराव पवार, दत्तात्रय आरे, भिवा घोरपडे, सुनील दुधाडे, कानिफनाथ तांबे, गोरक्षनाथ काकडे, बबनराव लबडे, योगेश सातपुते, सुलताना शेख, सुलाबाई आदमाने, संतोष सालके, बाळासाहेब म्हस्के, ज्ञानदेव गायकवाड आदी उपस्थित होते.

कॉ. राजन क्षीरसागर म्हणाले, सध्या साखरेचे दर ६ हजार २०० रुपये क्विंटल झाले आहेत. मात्र, शेतकऱ्यांना उसाचा दर २७०० ते ३२०० रुपये देण्यात आला आहे. साखरेचे दर वाढलेले असताना या वाढीव दराचा फरक शेतकऱ्यांनाही मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरसाठी डिझेल टॅक्स फ्री करून ते कमी दरात उपलब्ध करून दिले पाहिजे.

किसान सभेचे राज्य सेक्रेटरी कॉ. अशोक सोनारकर यांनी संघटना विस्तारावर भर देण्याचे आवाहन केले. किसान सभेच्या गावोगावी शाखा सुरू करून शेतकऱ्यांना मदत करावी. नवीन लोकांपर्यंत किसान सभेचे विचार पोहोचवावेत. ज्यांचे वडील आणि आजोबा भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीत होते, त्यांच्या मुलांना पुन्हा या चळवळीत आणावे.

कॉ.अ‍ॅड. सुभाष लांडे म्हणाले, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आज शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. जिल्ह्यात पावसाचे अत्यल्प प्रमाण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती अडचणीची झाली आहे.

### १६ सप्टेंबरला तहसील कार्यालयांवर मोर्चे

कार्यशाळेत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. दि. १६ सप्टेंबर रोजी सर्व तहसील कचेऱ्यांवर मोर्चे काढण्याचे ठरविण्यात आले. शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने डिझेल उपलब्ध करून द्यावे, साखरेचे वाढलेले दर लक्षात घेऊन शेतकऱ्यांना त्यातील फरक देण्यात यावा, जिल्ह्यात पावसाचे अत्यल्प प्रमाण पाहता दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना विम्याची ५० टक्के आगाऊ रक्कम देण्यात यावी तसेच साठ वर्षावरील शेतकऱ्यांना दरमहा पाच हजार रुपये पेन्शन सुरू करावी, आदी मागण्या या मोर्चातून करण्यात येणार आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

